बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com
# बेरार टाईम्स
मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे



गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१२ गोंदिया | अंक १८ | बुधवार,दि.१२ एप्रिल २०२३ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024

# जातनिहाय जनगणनेसाठी ओबीसींचा भंडाऱ्यात उसळला जनसागर



**भंडारा:** जातनिहाय जनगणना करण्याच्या मागणीला घेऊन भंडारा येथे ओबीसी संघटनांच्या माध्यमातून आज ११ एप्रिल रोजी दसरा मैदानावरुन निघालेल्या भव्य मोर्चात शासनाचे लक्ष वेधले. जातनिहाय जनगणना व ओबीसींच्या मुद्याला घेऊन सर्वपक्षीय विचारधारेतील ओबीसींनी हजरी लावल्याने मोठ्या संख्येत जनसागर उसळला होता. त्यानंतर या मोर्च्याचा समारोप जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात करण्यात आला. यावेळी सभेच्या माध्यमातून सरकारचे लक्ष वेधण्यात आले. १९३१ नंतर आजपर्यंत ओबीसींची जातीय जनगणना झालीच नाही. ओबीसींची आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतीक व सामाजिक प्रगती रोखण्याचे काम होत आहे. शेतकऱ्यांना अनेक सोयीसवलती व आत्मनिर्भर बनवू इच्छिणाऱ्या स्वामीनाथन आयोगाला केंद्र सरकारने रद्द केले आहे. शेतमालाच्या हमीभावाची कोणतीही कायदेशीर तरतूद सरकारने केलेली नाही.



उलट संसदेच्या २० जुलै व १३ ऑगस्ट २०२१ या कालावधीतील अधिवेशना दरम्यान केंद्रीय गृहराज्यमंत्री नित्यानंद रॉय यांनी ओबीसींची जातनिहाय जनगणना करण्यात येणार नाही असे स्पष्ट केले. केंद्र सरकारने यापुर्वीच इम्पेरिकल डेटा (जातनिहाय आकडेवारी) देता येणार नाही, असे लोकसभेत सांगितले. ओबीसींवर जाणीवपूर्वक अन्याय केला जात असल्याने या विरोधात जिल्ह्यातील ओबीसींनी आंदोलनात्मक भूमिका घेत आज रस्त्यावर शक्तीप्रदर्शन केले.

### ओबीसींच्या प्रमुख मागण्या

**ओबीसींची जातनिहाय जनगणना केंद्र व राज्य सरकारने तातडीने करावी. प्रत्येक जनगणनेत ओबीसींचा स्वतंत्र रकाना असावा. शेतमालासाठी हमी भावासाठी कायदा करावा, लोकसभा व विधानसभेत ओबीसींचे राखीव मतदार संघ करावे, सरकारी व खासगी क्षेत्रात ५२ टक्के आरक्षण द्यावे, एससी व एसटीसारख्या सवलत देण्यात याव्या, शेतकऱ्यांना ६० वर्षानंतर १० हजार प्रतिमाह पेन्शन लागू करावी, क्रिमिलेअरची अट रद्द करावी, शासकीय नोकऱ्यातील अनुशेष भरुन पदोन्नती देण्यात यावी, नोकर भरतीचे कंत्राट तातडीने रद्द करावे व अन्य मागण्यांचा समावेश आहे.**

### या संघटनांचा आंदोलनात सहभाग

**ओबीसी जनगणना परिषद, ओबीसी सेवा संघ, ओबीसी संघर्ष कृती समिती, ओबीसी युवा अधिकार मंच, स्टुडंड राईस असोसिएशन, ओबीसी जागृती मंच, राष्ट्रीय ओबीसी महासंघ, तसेच ओबीसीमधील सर्व जातनिहाय समाज संघटना महामोर्चात सहभागी झाल्या होत्या.**



# लालघाटी ते टाकेझरी जंगलात पोलीस-नक्षल चकमक

**गोंदिया:** महाराष्ट्र व छत्तीसगड सीमावती गादिया जिल्ह्यातील सालेकसा पोलीस ठाण्यातर्गत लालघाटी ते टाकेझरी जंगल भागात पोलीस पथक आणि नक्षलवादी यांच्यात ७ एप्रिल रोजी सायंका यी ६.३० वाजता चकमक झाली. ही चकमक तब्बल २० ते २५ मिनीटे सुरू होती.पोलिसांच्या दिशेने गोळीबार करणा?्या नक्षलवाद्यावर सालेकसा पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भारत सरकारद्वारेप्रति बंधीत असलेली माओवादी – नक्षलवादी संघटनेकडून दरवर्षी जानेवारी ते जून या दरम्यान टि.सी.ओ.सी.कालावधी पाळला जातो.या कालावधीत प्रशासना विरुद्ध बंड पुकारून देश विघातक कृती , घातपाताच्या घटना , विध्वसंक कृत्य करतात. नक्षलवादी जनमाणसात दहशत पसरवून आपला वर्चस्व दाखविण्याचा प्रयत्न करीत असतात. त्यामुळे पोलीस अधिक्षक निखिल पिंगळे, अप्पर पोलीस अधीक्षक अशोक बनकर, उपविभागीय पोलीस अधिकारी विजय भिसे यांच्या मार्गदर्शनाखाली नक्षल प्रभावित महाराष्ट्र- मध्यप्रदेश, छत्तीसगड सीमावर्ती भागात नक्षलवादी याच्या दहशतवादी कारवायांवर आळा घालण्याकरीता जिल्हा पोलीस पथक अभियान राबवित आहेत.

ग्राम टाकेझरी जंगल परीसरात पेट्रोलिंग करीत असताना दुपारी ४.३० वाजताच्या सुमारास सशस्त्र स्त्री व पुरुष नक्षलवाद्यांनी पोलीस पथकावर अंधाधुंद गोळीबार सुरु केला . पोलिसांनी ही त्यांना चोख उत्तर दिले. तब्बल २० ते २५ मिनीटे हा गोळीबार सुरू होता . पोलीस व वाढता दबाव पाहुन नक्षलवादी यांनी लालसलाम जिंदाबाद, माओवादी जिंदाबाद अश्या घोषणा देत धनदाट जंगलाचा फायदा घेत छत्तीसगड राज्याच्या सिमेत पळून गेले. या प्रकरणात सालेकसा पोलीस ठाण्यात ८ एप्रिल रोजी पोलीस उपनिरीक्षक राजधर पठाडे यांच्या तक्रारीवरून अज्ञात नक्षलवाद्यांवर विविध कलमांसह, सहकलम ३/२७ भारतीय हत्यार कायदा १९५१ सहकलम १०, १६ ब, १८, २०, २३ बेकायदेशिर हालचाल प्रतिबंधक कायदा १९६७ अन्वये दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे करीत आहे.

### हे साहित्य मिळाले

एक काळया रंगाची गणवेशा वरील टोपी ज्यास पाठी मागील बाजुस स्टीलची क्लीप आहे.एक निळया रंगाचा रुमाल पांढया चौकटीचा, एक जोड काळया रंगाचा परॉगान चप्पल असे साहीत्य मिळून आले.

### ८५ राऊंड फायर

पोलीस पथकाद्वारे नक्षलवाद्यांवर आत्मसंरक्षणनार्थ करण्यात आलेल्या गोळीबारात इंसास रायफलचे १३ राऊंड तर एके ४७ चे ७२ राऊंड असे एकूण ८५ राऊंड फायर करण्यात आले. या गोळीबारात नक्षलवादी जखमी झाल्याची दाट शक्यता आहे. नक्षलवाद्यांची शोध मोहीम सुरू आहे. पोलीस पथकातील सर्व अधिकारी व अंमलदार सुरक्षित आहेत.

### नक्षलवादी काड्या घेऊन येतांना पोलिसांनी घेतली पोझीशन

विशेष अभियान सी -६० चव्हान पथकातील पोलीस अधिकारी अंमलदार, छत्ती सगड राज्याचे पोलीस अंमलदार व मध्यप्रदेशचे हक्स फोर्सचे अंमलदार यांना समोरून दोन इसम साध्या गणवेशात खांदया वर कु?हाड घेउन येत होते.त्याच्या मागे ठराविक अंतर ठेऊन ३ स्त्रीया व २ पुरुष गडद काळ्या हिरव्या रंगाचा गणवेश परीधान करुन हातात शस्त्रे घेऊन पोलीस पथकाचे दिशेने येताना दिसले. त्यावेळी पोलीस पथकाने पोझीशन घेतल्याने नक्षलवादी ओरडत मागेच पळाले.

## नक्षल्यांचा घातपाताचा डाव उधळला; स्फोटकांसह मोठा शस्त्रसाठा जप्त

**गडचिरोली : घातपात घडविण्याच्या उद्देशाने नक्षलवाद्यांनी जमिनीत पुरून ठेवलेली स्फोटके आणि शस्त्रसाठा हस्तगत करण्यात गडचिरोली पोलिसांच्या नक्षलविरोधी पथकाला यश आले आहे. ही कारवाई धानोरा उपविभागांतर्गत गॅरापत्ती पोलीस मदत केंद्र हद्दीतील टिपागड जंगलात ७ एप्रिल रोजी करण्यात आली.गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी टिपागड जंगल परिसरात शोधमोहीम राबवली होती. दरम्यान त्यांना स्फोटके आणि शस्त्रसाठा आढळून आला. यामध्ये १२ बोर रायफल, २ स्फोटके व शस्त्र साहित्य जप्त करण्यात आले.पोलिसांना नुकसान पोहोचविण्यासाठी तसेच घातपात घडवून आणण्यासाठी नक्षलवादी गोपनीय पद्धतीने जमिनीत शस्त्रे पुरवून ठेवतात. नक्षल सप्ताह व इतरवेळी या शस्त्रांचा वापर केला जातो. पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी जवानांचे कौतुक केले.**

# भारतातील व्याघ्रगणनेचा अहवाल जाहीर, देशात ३,१६७ वाघ



**नागपूर:** भारतातील व्याघ्रगणनेचा अहवाल जाहीर झाला असून भारतातील वाघांची संख्या २०२३ वरुन ३,१६७ वर पोहोचली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या महिन्याच्या सुरुवातीला "प्रोजेक्ट टायगर' ला ५० वर्ष पूर्ण झाल्याबाबत भारतातील व्याघ्रगणनेचा अहवाल प्रकाशित केला. नवीन आकडेवारीनुसार, देशातील वाघांची संख्या २,९६७ वरुन ३,१६७ वर पोहोचली आहे. २००६ मध्ये वाघांची संख्या १,४११, २०१० मध्ये १,७०६, २०१४ मध्ये २,२२६, व २०१८ मध्ये २,९६७ इतकी होती. पंतप्रधान मोदीं यांनी अमृतकाळा दरम्यान वाघांच्या संवर्धनासाठी सरकारचा दृष्टीकोन देखील प्रकाशित केला. तसेच "आंतरराष्ट्रीय बिग कॅट्स अलायन्स'ची देखील सुरुवात केली. "प्रोजेक्ट टायगर'ला ५० वर्षे पूर्ण झाल्याच्या स्मरणार्थ नाण्याचेही यावेळी प्रकाशन करण्यात आले.

यावेळी बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले व्याघ्र प्रकल्पाचे यश हे केवळ भारतासाठीच नाही तर संपूर्ण जगासाठी अभिमानास्पद आहे. वन्यजीवांच्या भरभराटीसाठी, परिसंस्थेची भरभराट होणे महत्त्वाचे आहे. हे भारतात होत आहे. भारताने वाघांचे केवळ संरक्षणच केले नाही तर त्यांना भरभराटीसाठी एक परिसंस्थाही दिली आहे. भारत असा देश आहे जिथे निसर्गाचे रक्षण करणे हा संस्कृतीचा भाग आहे. त्यामुळेच वन्यजीव संवर्धनात अनेक अद्वितीय यश मिळवले आहे. जगाच्या केवळ २.४ टक्के भूभागासह, जागतिक विविधतेमध्ये भारताचा वाटा सुमारे आठ टक्के आहे.

### व्याघ्र संवर्धनात राज्याची दर्जेदार कामगिरी

देशभरातील व्याघ्र प्रकल्पांच्या व्यवस्थापन परिणामकारकता मूल्यांकनात (मॅनेजमेंट इफेक्टिव्हनेस इव्हॅल्युएशन-एमईई) महाराष्ट्राची कामगिरी उंचावली आहे. रविवारी जाहीर झालेल्या अहवालात राज्यातील पेंच व्याघ्र प्रकल्पाची नोंद "उत्कृष्ट' गटात, मेळघाट, ताडोबा-अंधारी, नवेगाव-नागझिरा, सह्याद्री या प्रकल्पाची नोंद "खूप चांगले' गटात आणि बोर व्याघ्र प्रकल्पाची नोंद "चांगले' या वर्गात झाली आहे.

पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या आतील सिंचन वसाहत पूर्णपणे दूर सारल्यानंतर येथे वाघांच्या व इतर प्राण्यांच्या संवर्धनासाठी केलेल्या उत्कृष्ट व्यवस्थापनामुळे ते "उत्कृष्ट' या गटात नोंदवले गेले आहे, तर मेळघाट, ताडोबा-अंधारी, नवेगाव-नागझिऱ्यातील व्यवस्थापन चांगले आहे. "बोर' व्याघ्र प्रकल्पाचे बफर क्षेत्र अजून यात समाविष्ट झालेले नाही. या व्याघ्र प्रकल्पाला स्वतंत्र संचालक नाही, त्यामुळे ते थोडे मागे पडले असले तरीही पुढील व्याघ्रगणनेत ही त्रुटी दूर होईल, असा विश्वास आहे.

# फ्लाय अ‍ॅशच्या धोक्यापासून जिल्हा संकटातून बाहेर

**गोंदिया::** तिरोडा तालुक्यातील अदानी विद्युत प्रकल्पात निघणारी फ्लॉय अ‍ॅशच्या वाहतुकीमुळे जिल्ह्यातील अनेक रस्त्यांवर नागरिकांना वाहतुकीसह रहदारी करताना अडचणी निर्माण होत होती. तसेच वाहनातून उडणाऱ्या फ्लॉय अ‍ॅशमुळे अनेक अपघात व आजारही, विशेषतः डोळ्यांचे होत होते. मात्र काही दिवसांपासून अदानी प्रकल्पातून वाहनांतून होणाऱ्या फ्लॉय अरॅशची वाहतूक बंद झाल्याने फ्लॉय अ‍ॅशच्या संकटातून जिल्ह्याला मुक्तता मिळाली आहे.

जिल्ह्यातील बेरोजगार तरुणांना रोजगाराची संधी निर्माण झाली आहे. या प्रकल्पात स्थायी पेक्षा अस्थायी रोजगार जास्त आहे. असे असले तरी शेकडो बेरोजगारांना काम मिळत आहे. त्यातच अदानी विद्युत प्रकल्पात वीज तयार करण्याकरिता मोठ्या प्रमाणात कोळशाच्या वापर होत आहे. त्यातून निघाणारी फ्लॉय अ‍ॅश चारचाकी वाहनांच्या माध्यमातून विविध स्थानी नेण्यात येते. ही फ्लॉय अ‍ॅश नेतांना गोंदिया-तिरोडा, तिरोडा-तुमसर तसेच इतर मार्गावरही नागरिकांना प्रवास करणे कठीण होत असे.



या प्रकाराने अनेकवेळा अपघात होत असतं. तसेच वाहनांतून उडणाऱ्या राखेने नागरिकांना कमालीचा त्रासही सहन करावा लागत असे. मात्र काही दिवसांपासून चारचाकी वाहनांतून फ्लॉय अ‍ॅशची वाहतूक बंद करण्यात आली आहे. सध्या तरी जिल्ह्यात फ्लॉय अ‍ॅशच्या संकटातून व होणाऱ्या पर्यावरणाच्या ऱ्हासापासून मुक्त झाले आहे.

### रेल्वेचे वेळापत्रक बिघडले...

सध्या चारचाकी वाहनांतून होणारी फ्लॉय अ‍ॅशची वाहतूक बंद आहे. परिणामी ही फ्लॉय अ‍ॅश रेल्वेने नेण्यात येत आहे. परिणामी तिरोडा ते गोंदिया या मार्गावर प्रवासी गाड्यांचे वेळापत्रक मागील काही दिवसांपासून बिघडले आहे. याला अदानी विद्युत प्रकल्पातील रेल्वेच्या माध्यमातून फ्लॉय अ‍ॅशची वाहतूक कारणीभूत असल्याचे बोलले जात आहे.

# सोनी हत्याकाडातील सात आरोपींना जन्मठेपेची शिक्षा

भंडारा: तुमसर शहरातील सराफा व्यापारी संजय चिमनलाल सोनी त्यांची पत्नी पूनम संजय सोनी व त्यांचा मुलगा दृमिल संजय सोनी यांच्या हत्येप्रकरणी भंडारा जिल्हा व सत्र न्यायालयाने सात जणांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावली आहे. हा निर्णय दुपारी तीन वाजता जिल्हा व सत्र न्यायाधीश राजेश अस्मर यांनी सुनावला. हत्याकांडानंतर तब्बल नऊ वर्षानंतर या प्रकरणात शिक्षा ठोठावण्यात आली आहे.

जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आलेल्यांमध्ये शहानवाज उर्फ बाबू सत्तार शेख (३२), महेश सुभाष आगासे (३५), सलीम नजीम खा पठाण (३४), राहुल गोपीचंद पडोळे (३२), मोहम्मद अफरोज उर्फ सोहेल युसुफ शेख (३४), शेख रफिक शेख रहमान (४५) व केसरी मनोहर ढोले (३४) अशी नावे आहेत. या खटल्यात विशेष सरकारी वकील म्हणून अ‍ॅड. उज्वल निकम यांची नियुक्ती करण्यात आली होती.२५ फेब्रुवारी २०१४ च्या मध्यरात्रीच्या सुमारास तुमसर येथे प्रतिष्ठित सराफा व्यवसायिक संजय चिमणलाल रानपुरा (सोनी (४७), त्यांची पत्नी पूनम संजय रानपुरा (४३) व त्यांचा मुलगा दुर्मिह संजय रानपुरा (१२) यांची हत्या करण्यात आली होती. हत्येनंतर अवघ्या २४ तासात तुमसर पोलिसांनी आरोपींना अटक केली होती. त्यापैकी एकाला मुंबईतून अटक करण्यात आली होती. हत्येनंतर आरोपींनी ८.३ किलो सोने चांदीचे दागिने व ३९ लक्ष रुपयांची रोख चोरून नेली होती. गळा आवळून खून केल्यानंतर लूटपाटीच्या घटनेला अंजाम देण्यात आला होता.आता न्यायालयाने आज अंतिम निर्णय दिला.

# वज्रमूठ सभेसाठी महाविकास आघाडी सज्ज



**गोंदिया:** ईडीच्या धाकातून स्थापित करण्यात आलेली ही ईडी सरकार आहे. राज्यात एकनाथ-फडणवीस यांची सरकार येताच राज्यातील उद्योग गुजरातला पळविण्याचे काम सुरू झाले. यासाठीच हे धुर्त षडयंत्र रचण्यात आले होते. नुकताच सादर करण्यात आलेला अर्थ संकल्पात ओबीसी, एससी, एसटी या प्रवगार्साठी तरतुद करण्यात आलेल्या निधीला कात्री लावण्यात आली आहे. यावरून ही ईडी सरकार बहुजन विरोधी आहे असे स्पष्ट होते. असा आरोप माजी मंत्री विजय वडेट्टीवार यांनी केला. येत्या १६ एप्रिल रोजी नागपूर येथे महाविकास आघाडीतर्फे वज्रमूठ सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या सभेसाठी आघाडीतील सर्व पक्ष कामाला लागले असल्याचीही माहिती त्यांनी दिली.

महाविकास आघाडीतर्फे नागपूर येथे १६ एप्रिल रोजी वज्रमूठ सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या सभेच्या पुर्व नियोजनाच्या जिल्हा निहाय आढावा घेण्यासाठी माजी मंत्री विजय वडेट्टीवार हे गोंदियात आले होते. यानिमित्त आयोजित पत्र परिषदेच्या माध्यमातून त्यांनी राज्याच्या एकानाथ-फडणवीस सरकारवर तासेरे ओढले. वडेट्टीवार पुढे म्हणाले, या राज्यात महाविकास आघाडीची सरकार अडीच वर्ष राहिली.

महाविकास आघाडीच्या सरकारने कर्ज माफिचा ऐतिहासीक निर्णय घेतला. त्याच बरोबर शेतकऱ्यांना प्रोत्साहन भत्याच्या संदर्भात निर्णय घेण्यात आला होता. त्या निर्णयला वित्त विभागाकडून मंजुरीही प्राप्त झाली होती. मात्र त्यानंतर सरकार कोसळली. या ईडी सरकारने धुर्त षडयंत्र रचून महाविकास आघाडीचे सरकार पाडले. हे खुद्द आता या सरकारातील मंत्री स्विकार करीत आहेत. महाविकास आघाडीच्या सरकारला पाडण्यासाठी तब्बल १५० वेळा बैठक घेण्यात आल्या होत्या. यावरून केवढे मोठे षडयंत्र रचण्यात आले होते, हे देखील सिद्ध झाले आहे. सरकारने शेतक?यांना प्रोत्साहन पर १५ हजार रुपये जाहीर केले आहे. मात्र अद्यापही शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे आले नाही. एकंदरीत या सरकारचा कामकाज म्हणजे मघोषणांचा सुकाळ मात्र पैसे देतांना दुष्काळफ अशी परिस्थिती दिसून येत आहे. ओबीसी, एससी, एसटी या प्रवर्गाच्या विकासासाठी तरतुद करण्यात आलेल्या निधीला मोठी कात्री लावण्यात आली आहे. आधी ओबीसींसाठी ३१८० कोटीची तरतुद रहायची आता ती २७०० वर करण्यात आली आहे. अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांवरही कात्री लावण्यात आली आहे. जातीच्या समिकरणात गुंतवूण आपली पोळी शेकण्याचे काम या सरकार पक्षातील मंर्त्यांकडून केले जात आहे. असाही आरोपी त्यांनी केला. वज्रमूठ सभेचे आयोजनासंदर्भात बोलतांना ते म्हणाले महाविकास आघाडीच्या तिन्ही पक्षातर्फे नागपूर येथे सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या पुर्वी झालेल्या दोन सभेला जनतेचा भरघोष प्रतिसाद मिळाला. यामुळे सत्ताधाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढे ढकण्याचे काम केले जात आहे. वज्रमूठ या सभेत कांग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना या तिन्ही पक्षाचे कार्यकर्ते कामाला लागले आहेत.

निश्चितपणे नागपुरचीही सभा ऐतिहासीक ठरणार, असाही विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी त्यांच्या सोबत आमदार सहषराम कोरोटे, आमदार मनोहरराव चंद्रिकापुरे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष दिलीप बंसोड, राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार राजेंद्र जैन, उद्धव गटाचे पंकज यादव, अशोक गुप्ता, अमर वऱ्हाडे, राधेलाल पटले, जहीर अहमद, केतन तुरकर, रमेश अंबुले आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# महात्मा फुले यांच्या जयंतीला शासकीय सुटी जाहीर करा

## सत्यशोधक समाज संघाची मागणी; मुख्यमंत्र्यांना पाठविले निवेदन



**गोंदिय** : क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीला (११ एप्रिल) शासकीय सुटी जाहीर करण्यात यावी, अशी मागणी सत्यशोधक समाज संघाने केली आहे. याबाबतचे निवेदन उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंर्त्यांना पाठविले आहे.

आधुनिक भारताचे शिल्पकार म्हणून तात्यासाहेब महात्मा ज्योतिबा फुले यांना मानण्यात येते.

महात्मा फुले यांनी स्वातंत्र्य, समता, मित्रता व न्याय ही मुल्ये भारतातच नाही तर विश्वात रुजविण्यासाठी आपले जीवन समर्पित केले. महात्मा फुले यांनी सत्य प्रस्थापित करण्यासाठी जिवाची बाजी लावली. मराठी भाषेत पहिलं पवाड्यारुपी शिवचरित्र लिहिण्याचा, कुळवाडीभूषण छत्रपती शिवाजी महाराज यांची लपविलेली समाधी शोधण्याचा व शिवजयंती सुरू करण्याचा मान तात्यासाहेब महात्मा फुले यांनाच जातो. कारण शिवाजी महाराजांना महात्मा फुले यांनी आदर्श अर्थात गुरू मानले.

समस्त शुद्र-अतिशुद्रांच्या कल्याणासाठी अहोरात्र झटणा?या महात्मा फुलेंना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी गुरूस्थानी मानून महात्मा फुलेंचे अपूर्ण कार्य भारतीय संविधान लिहून पूर्णत्वास नेले. महात्मा फुलेंचे गुरू शिवाजी महाराज व महात्मा फुले यांना गुरू मानणारे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी शासकीय सुटी मंजूर आहे. परंतु महात्मा फुले यांच्या जयंतीला शासकीय सुटी नाही, हे योग्य नाही. दरम्यान, शासनाने महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीला (११ एप्रिल) शासकीय सुटी जाहीर करावी, तसा आदेश काढावा, अशी मागणी निवेदनातून केली आहे.

उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन देताना कैलाश भेलावे, पेमेंद्र चव्हाण, राजेश नागरिकर, प्रमोदकुमार बघेले, डी. आय. खोब्रागडे, सुनील भोंगाडे, भंडारी चौधरी, प्यारेलाल तुरकर, विनोद बन्सोड उपस्थित होते.

## संपादकीय

# आंबेडकरी पत्रकारिता हाच मुख्यप्रवाह!

माध्यम हा जनमानसाचा आरसा असतो असं म्हणतात. पण हा आरसा तुम्हाला खरे प्रतिबिंब दाखवलेच असं काही नाही. माध्यमं तुम्हाला समाजाचं तेच रूप दाखवतात जे त्यांना दाखवायचंय. जर माध्यमांकडे बघून आपण आपल्या समाजाचा अंदाज बांधायला गेलो तर भारतीय समाज अत्यंत संपन्न, इतर काही कामं शिल्लक नसल्याने गाईच्या आणि बाईच्या मागे लागलेला, हिंदुत्ववादी विचारसरणीचा किंवा हिंदुराष्ट्र वगैरे वाटायला लागेल. माध्यमांकडे बघून समाजाचा अंदाज बांधायला गेलो तर भारतात दररोज मूर्खपणा सिद्ध करण्यासाठी वक्तृत्व स्पर्धा लागलेल्या असतात की काय असा ही समज होऊ शकतो. त्यामुळे माध्यमांची चर्चा करायची असेल तर त्यांच्याकडे सुवर्णलंकारी कोंदणातून न पाहता वस्तुनिष्ठ पद्धतीने पाहिलं पाहिजे.

भारतीय माध्यम हा देशाचा खरा चेहरा दाखवू शकत नाहीत हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आधीच ओळखलं होतं. कॉंग्रेसच्या दावणीला बांधलेली माध्यमं आणि पत्रकार 'जो तुमको हो पसंद वहीं बात करेंगें' अशा पद्धतीनेच वागणार. अशा वेळी आपलं स्वतःचं माध्यम असायला हवं, जे दलित-शोषित जनतेचा आवाज उचलेल अशी गरज डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाटत होती. यातूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेला सुरुवात झाली. एका दृष्टीकोनातून यासाठी कॉंग्रेसचे आभार मानायला हवेत. माध्यमांवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले चिंतन हे आजही किती मोलाचं आहे. माध्यमांवर एका विशिष्ट पक्ष, भांडवलदार आणि विचारांची मालकी आल्यावर काय करायला पाहिजे, असा प्रश्न मला पडला नाही. मला त्यासाठी विचार करण्यावर वेळ घालवावा लागला नाही.


आपला विचार मांडायचा तर माध्यमं आपली असली पाहिजेत. मुख्यप्रवाहातील माध्यमांकडून फार अपेक्षा ठेवता येणार नाही, एखादा हिरो पकडायचा आणि त्याची पूजा करायची हा प्रकार तेव्हाही सुरु होता आणि आजही सुरु आहे. फरक एवढाच आहे की तेव्हा मुख्य प्रवाह हे करत होता, आता मुख्य आणि पर्यायी माध्यमं ही हेच करताना दिसतायत. मुख्य प्रवाहातील माध्यमं पक्षपातीपणे वागल्यामुळे समाजा-तील महत्त्वाचे प्रश्न, लढे, हितसंबंधांना बाधा आणणारे विषय यांकडे पूर्णतः डोळेझाक होते. कधी कधी माध्यमांचा अजेंडा इतका विषारी असतो की जर तुम्ही तयारीचे नसाल तर तुम्ही संपून जाऊ शकता. डॉ. आंबेडकरांना, त्यांच्या मागण्यांना अनेकदा मुख्य प्रवाहातील माध्यमांनी टीकेचं लक्ष्य बनवलं. दलितांसाठी वेगळा मतदारसंघ मागणे म्हणजे हिंदू विरोधी, देश विरोधी आहे असं चित्र माध्यमांनी रंगवलं. आज जसं आपण वेळोवेळी वेगवेगळ्या इश्यूवर राष्ट्रीयत्वाची परीक्षा द्यावी अशी राजकीय व्यवस्थेची आणि माध्यमांची अपेक्षा असते तशी त्यावेळी काँग्रेसप्रणित माध्यमांच्या राष्ट्रीयत्वाच्या व्याख्येवर खरं उतरावं लागे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं समाजकारण, राजकारण या व्याख्येत बसत नव्हतं. महात्मा गांधी आणि डॉ आंबेडकर या दोन राष्ट्रीय पुरुषांकडे बघण्याचा माध्यमांचा दृष्टीकोन वेगवेगळ्या होता. दलित उद्धारासाठी काम करणाऱ्या आंबेडकरांना प्रसंगी भीमासुर म्हणणारी माध्यमं गांधीजींच्या 'हरिजन' संकल्पनेला डोक्यावर उचलून नाचत होती. डॉ. आंबेडकरांच्या रक्तहीन आंदोलनांना माध्यमांनी कधीच सत्याग्रह मानलं नाही. काळाराम मंदिर किंवा चवदार तळ्याच्या आंदोलनातून जो सामाजिक उत्थानाचा, न्यायाचा जो लढा उभारला गेला त्या लढ्यांच्या पायावर आजचा भारत उभा आहे. मूकनायक ते प्रबुद्ध भारत असा डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेचा प्रवास आहे. मूकनायकाला आवाज मिळवून देऊन प्रबुद्ध करण्याची प्रक्रीया डॉ. आंबेडकरांनी पार पाडली. त्यानंतर राज्यघटनेची निर्मिती करत असताना अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा मुलभूत देणगी या महामानवाने दिली. तरी सुद्धा भारतीय माध्यमांचा त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टीकोन फार बदलला नाही. आजही ६ डिसेंबरला लाखों लोक चैत्यभूमीवर गोळा होत असूनही माध्यमांमध्ये त्याचं प्रतिबिंब पडत नाही. गर्दी गोळा करायला 'नवसाला पावणारा' असं मार्केटींग करावं लागत नाही. ही आंबेडकरांच्या व्यक्तिमत्वाची, त्यांनी केलेल्या कामांची, विचारांची ताकत आहे.

डॉ. आंबेडकर यांनी सदैव मुख्य प्रवाहातील विचारधारेला आव्हान दिलं, मुख्यप्रवाहाच्या मेहरबानीवर अवलंबून न राहता वेगळा प्रवाह निर्माण केला. मुख्य प्रवाहावर दबाव निर्माण केला. आपल्या लढ्याला रक्तरंजित होऊ दिलं नाही. देश तुटू दिला नाही. तरी डॉ आंबेडकर मुख्य प्रवाह नाहीत? डॉ. आंबेडकरांच्या वाट्याला ही अवहेलना का आली असावी याचा अंदाज आपल्याला योगेंद्र यादव यांनी केलेल्या एका सर्व्हेतून लक्षात येतं. देशातील हिंदी आणि इंग्रजीतील ३१५ प्रभावशाली पत्रकारांमध्ये एकही दलित आढळून आला नाही. त्यातील ७१ टक्के पत्रकार हे उच्चवर्णीय पुरुष होते. माध्यमांवर आजही जातीविशेष चा पगडा आहे. त्यातही पुरुषांचा! डॉ. आंबेडकरांना त्याकाळी माध्यमांनी डोक्यावर का घेतलं नसेल याचा अंदाज आपल्याला यातून बांधता येतो.

डॉ. आंबेडकरांनी दिलेली जाहिरात टिळकांनी का नाकारली असेल, त्याचं उत्तरही आपल्याला आपोआप सापडेल. हे नाकारणं, जातीयवादी भूमिकेतून होते की प्रस्थापित मानसिकतेतून यावर चर्चा होऊ शकते. पण जे काही आहे, या घटनेने ही लढाई सोपी नाही याचा डॉ आंबेडकरांना जाणीव मात्र करुन दिली. माध्यमांवरील वर्चस्व हे पैशाच्या ताकदीवर सुद्धा मिळवता येतं. पैशाची ताकत ज्यांच्याकडे होती किंवा आहे त्यांना आजही त्यांचा अजेंडा पुढे रेटण्यामध्ये रस आहे. त्यामुळे स्वतंत्र पत्रकारिता करत असताना आंबेडकरांनी पैसे कमवण्याकडे सुद्धा लक्ष दिलं आणि वकिली सुरू ठेवली. हा इतिहास इतक्यासाठीच उगाळणे आवश्यक आहे की, आजची स्थिती ही काही वेगळी नाही. तेव्हा माध्यमं काँग्रेसच्या प्रभावाखाली होती आज ती भाजपच्या प्रभावाखाली आहेत. तेव्हा काँग्रेसच्या राष्ट्रवादाच्या कल्पनेच्या विरोधात भूमिका घेता येत नव्हती आज भाजपच्या राष्ट्रवादाच्या कल्पनेने उच्छाद मांडला आहे. अशा वेळी डॉ आंबेडकरांनी सांगितलेला मार्ग प्रशस्त वाटतो. आपले प्रश्न मांडण्यासाठी आपली माध्यमं उभी करा. आज समाजमाध्यमाच्या (सोशल मिडीयाच्या) माध्यमातून हे करणं सोप्पं झालंय. मुख्य प्रवाहातील माध्यमांवर विसंबून राहता येणार नाही. समाजमाध्यमं, अल्टरनेट मिडीया मुख्य प्रवाहातील माध्यमांवर प्रभाव आणि दबाव निर्माण करू शकतो. समाजातल्या वेगवेगळ्या घटकांमध्ये असे 'आंबेडकरी' पत्रकार निर्माण होणे गरजेचे आहे. आपले प्रश्न, समस्यांसाठी लढणारे, आवाज उठवणारे हे प्रवाह हे 'वैकल्पिकफ-अल्टरनेट माध्यमं नसून हाच खरा मुख्य प्रवाह आहे. आंबेडकरांची पत्रकारिता आपल्याला हाच संदेश देते.

# महात्मा जोतीराव फुले यांचे कार्य आणि शिक्षण विचार





सतीश जामोदकर
हिवरा बु.मानोरा, वाशिम मो.९४२३३७४६७८

भारतातील शिक्षणासंबंधी विचार करता, प्रामुख्याने काही महत्वपूर्ण कालखंड पडतात. त्यामध्ये वैदीक पूर्व काळ आणि वैदीक पुर्वोत्तकाळ आणि वैदिक काळ, वैदिक पूर्व काळात भारताने संस्कृतीची प्रगल्भता आणि उच-चअवस्था गाठली होती. भारताने जगाला अपरंपार ज्ञानसंपत्ती प्रदान केली. हा काळ सिंधू संस्कृतीचा होता. त्याच कारणाने स्त्रियांना समान शिक्षणाच्या संधी आणि हक्क नाकारण्यात आले नव्हते हे होय, दुसरे म्हणजे त्याकाळी मातृसत्ताक पद्धती अंमलात होती. वेदपूर्व काळात स्त्री व पुरुषांना समान स्वरूपाचे प्रशिक्षण त्याकाळी अस्तित्वात होते. स्त्रियांनी यशा ऋचा लिहिल्या तसेच त्यांनी सैनिकीपेशेही स्विकारले होते. परंतु ऋगवेद काळापासून ख्रिस्त शतकाच्या १२०० पर्यंतच्या दोन-अडीच हजार वर्षाच्या कालावधीत हळूहळू स्त्री शिक्षण बंद झाले. वैदिकोत्तर काळाच्या दरम्यान मनुसंहिता लागू झाली आणि शुद्र व स्त्रिया यांची पदानवती केली. पुन्हा बौद्धधम्माच्या काळात स्त्रीशिक्षणाला एक नवी चालना मिळाली. सम्राट अशोकाची मुलगी संघमित्रा हिने श्रीलंकेत तत्वज्ञानाचे एक पीठढ स्थापन केले. असे उदाहरणे पाहावयास मिळतात. त्यानंतरच मोगलांचा काळ शिक्षण संबंधाने फारसा उच्च नव्हता. त्यामध्ये फारसे घडले असे दिसत नाही.

परंतु त्यानंतर इंग्रज या देशात आले आणि त्यांच्या ईस्टइंडिया कंपनी सरकारच्या १९१३ सातच्या सनदेन्वयाने भारतता प्रथमच प्रथमच मर्यादित अर्थाने शिक्षण सर्वांना खुले झाले. भार-तात इंग्राजांचे राज्य आल्यावर शिक्षण, दळणवळण इत्यादी क्षेत्रात हळू-हळू आमूलाग्र बदल झाला. पाश्चिमात्य संस्कृतीचा प्रभाव पडू लागला. इंग्रजांच्या डोक्यात जातीय व्यवस्था नसल्यामुळे शिक्षणासंबंधी त्यांचे प्रयत्न सुरु होते. ते सर्वांसाठी परंतु येथे फक्त उच्चजातीच्या लोकांना शिक्षणाचा अधिकार असल्यामुळे, त्याचा फायादा त्यांनाच आपसूक झाला. इंग्रजांना दोन गोष्टींची गरज होती. एक म्हणजे इंग्रजी भाषेचे ज्ञान अवगत असणाऱ्या नोकरांची. आण्ही दुसरे त्यांच्याशी प्रामाणिक राहणाऱ्या निष्ठावंताची. एकोणीसाव्या शतकाच्या पूर्वाधात पाश्चात्य आणि देशी शिक्षण यावर ख्रिस्ती धर्मोपदेशकांनी भर दिला. नाही म्हणायला याचा फायदा उच्च जातीच्या लोकांना होत होता. शुद्रातिशुद्रा पर्यंत ते पोहोचणे मनुसंहितेमुळे कठिणच होते. तरीही अंशतः का होईना याचा फायदा शुद्रांना झालाच.

ख्रिसचती धर्मोपदेशकांनी १९२४ साली पुण्यात मराठी शाळा काढल्या. याच काळात इंग्रज महापंडीत थॉमस मेकॉले हे पहिले विधीमंत्री आणि सरकारी शिक्षण समितीचे अध्यक्ष या नात्याने काम पाहत असत. त्यांनी २ फेब्रुवारी १९३५ रोजी एक टिपण काढून त्यात इंग्रजी भाषेतून पाश्चात्य शिक्षण दयावे, असा निर्णय केला. भारतात शिक्षणाचा प्रसार करण्याच्या हेतूने स्थापन झालेली पहिली संस्था म्हणजे बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी ह्या संस्थेने १८२० साली शाळा उघडल्या. १८४० साली सरकारने शिक्षा मंडळी ही शिक्षणसंस्था स्थापन केली. १८३३ साली पुण्यात मुलींना शिक्षण देण्याचा प्रयत्न इंग्रज अधिकाऱ्यांच्या सल्ल्याने झाला. ती शाळा पेशव्यांच्या जुन्या राजवाड्यात काढली होती. या शाळेत मुली लपून-छपून शिकत आणि पसार होत. लोकभयामुळे थोड्याच दिवसात ती शाळा बंद पडली.

जोतीरावांचा जन्म झाला. त्यावेळी पेशवाईचा अंत झाला होता. परंतु त्यांच्या कायद्याचा अमल होताच, इंग्रज राजवटीमुळे काही सामाजिक बंधने शिथील होऊ लागली होती. त्याच कारणाने जोतीरावांना शिक्षण घेणे शक्य झाले होते. तरीही त्यात धंत पडत होता, कारण मनुच्या कलमांनी समाजग्रस्त होता. उच्च वर्णाचे वर्चस्व होते. बहुजनांना अघोषित शिक्षण बंदी होती. शुद्र, अतिशुद्र व स्त्रिया यांना कसलेच अधिकार नव्हते. सर्वत्र अज्ञान, अंधकार, अनीती व कर्मकांड यांचे प्रस्थ होते. या दरम्यान जोतीरावांचे शिक्षण चालू बंद होत होते. अखेर १८४७ साली त्यांनी इंग्रजी शाळ-तील अभ्यास पूर्ण केला. इंग्रजी विचारवंताची पुस्तके त्यांच्या वाचनात आली. त्याचा प्रभाव त्यांच्यावर पडला आणि एकानव्या स्फुर्तीने, विचाराने त्यांनी पुढील आयुष्यक्रमाची वाटचाल केली. अज्ञानाचे मुळ शिक्षण हे त्यांच्या लक्षात आले. अधोगतीचे कारण कळले. समस्येची उकल झाली. त्यावर उपाय योजना करण्यास कृती आरंभली आणि बहुजनांच्या आयुष्यात नवी पहाट उगवली.

१८४८ साल उजाडले ते नवे तेज घेऊन, नविन विचार, नविन प्रवाह फक्त भारतातच नव्हे तर जगभर, जुन्या गैरसमुतींना तडा देते. यावर्षी जगाच्या पाठीवर व भारतात नव्या उलथा पालथी झाल्या. त्या लक्षवेधक होत्या, कुठे भांडवली सम्राजाता तडा जाणाऱ्या जर कुठे उच्चवर्णाच्या वर्चस्वाला खिळखिळे करणाऱ्या या क्रांतीकारक वर्षात ाय घडले? तर कार्ल मार्क्स यांनी फ्रेडरिक एंगल्स सह लिहिलेला कम्युनिस्ट जाहिरनामा कम्युनिस्ट पक्षाने प्रसिद्ध केला. अमेरिकेत स्त्रियांच्या उद्धाराची चळवळ त्याच वर्षी न्युयॉर्क येथील वेल्सेयन चर्च येथे सुरु झाली. त्यावर्षी भारतात राजकीय स्थित्यंतरे झपाट्याने होत होती. सातारच्या छत्रपतींची गादी १८४८ सालीच विसर्जीत करण्यात आली. दादोबा तर्खडकर ह्यांनी १८४८ साली परमहंस सभा नाव-ाची एक गुप्त संस्था स्थापन केली. गोपाळ हरी देशमुख यांनी प्रभाकर पत्रात लोकहीतवादी या टोपन नावाने याच वर्षी आपली इतिहास प्रसिद्ध लेख मालिका ब्राम्हण जा-तीला उद्देशून लिहिलेली प्रसिद्ध होत होती. असे नावे प्रबोधनाचे पायंडे सर्वत्र पडत होते. आणि याच वेळी भारतातील बहुजन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शुद्रनिशुद्र व स्त्रियांसाठी बुधवार पेठेतील भिडेंच्या वाड्यात १८४८ च्या ऑगस्ट महिन्याच्या आसपास शाळा काढली. एका भारतीयाने केलेला हा पहिला प्रयत्न, त्यांना सखाराम यशवंत परांजपे, सदाशिव गोविंद हाटे व सदाशिवराव गोवंडे यांनी आर्थिक सहाय्य या शाळा चालविण्यास केले. स्त्रीयांसंबंधी त्यावेळी हिंदू शास्त्राच्या नुसार अनेक मते होती. ती अविश्वासी, दुष्ट, चंचल, अविचारी असते असे मानले जाई. तीला अपमानास्पद वागणूक दिल्या जाई. धर्म आणि सामाजिक रूढी-परंपरा यांनी तीचे जीवन जखळून ठेवले होते. यामध्ये ब्राम्हणवादी स्त्रियासह सर्वच जाती-धर्मांच्या स्त्रीबाबत असे विचार होते.

मनुपत शिरसावंध मानले जात असे. अशा काळी जोतीरावांनी अपूर्व असे धाडस केले आणि मनुस्पृतीताच आव्हाण दिले. त्यांनी अशी घोषणा केली.

आतातरी तुम्ही मागे होऊ नका, धिक्कारूनी टाका मनुमत

विद्या शिकताच पावाल ते सुख, घ्यावा माझा लेख जोती म्हणे.

१८४८ ते १८५२ पर्यंत जोतीरावांनी काढलेल्या शाळांची संख्या जवळपास १८ वर जा-वून पोहचली. सावित्रीबाईंनी त्यांना मोलाची साथ दिली. फुले दाम्पत्याने अवघ्या चार वर्षात १८ शाळा काढून विश्वविक्रम केला होता. स्त्री शिक्षणाच्या भरीव कामगिरी बद्दल विश्रामबागेत १६ नोव्हेंबर १८५२ रोजी फुले दाम्पत्याचा सरकारच्यावतीने शालजोडी अर्पण करुन सत्कार करण्यात आला. फुलेंच्या पूर्वी स्त्रीशिक्षणांचे प्रयत्न झाले नव्हते असे नव्हे. १९११ पर्यंत मुलींच्या शाळेचे तुरळक प्रयत्न झाले. पण उच्चजातीच्या विरोधामुळे ते अयशस्वी झाले. आज तोच वर्ग मोठ्या प्रमाणात शिक्षणाचा फायदा थघेत आहे. स्त्री शिक्षणच का? यासंबंधी इंटर शिक्षण कमिशन पुढे सादर केलेल्या निवेदनात महात्मा जोतीराव फुले म्हणतात की,

जिला स्वकीय म्हणता येईल, अशी एकही शाळा स्थापन झा-लेली मुलींची नव्हती. म्हणूण तशी शाळा स्थापन करण्याची प्रेरणा मला झाली. मी आणि माझ्या पत्नीने कित्येक वर्षापर्यंत त्या शाळेत काम केले. स्त्री शिक्षणाच्या आवश्यतेविषयी जोतीराव म्हण-तात. स्त्रिया आपल्या मुलांना त्यांच्या वयाच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षात जे वळण लावतात त्यातच त्यांच्या शिक्षणाची बिजे असतात. या पार्श्वभुमीवर एका समकालीन ब्राम्हण विचारवंताने केलेले मूल्यमापन लक्षणीय आहे. त्या विपरित काळात जोतीरावांनी आपल्या पत्नीला शिकवून तिच्याद्वारे ब्राम्हणांच्या मुलींना शिक्षीत केले ते ही कुठे? सनातनांच्या बालेकिल्ल्यात महार-मांग या वर्गातील लोकांसाठी शाळा स्थापन करुन त्या चालविणे व त्यांना समाजात बरोबरीचे स्थान मिळवून देणे हे त्यांचे कार्य म्हणजे सिंहाच्या गुहेत शिरुन त्याची आयाळा पकडण्यासारखे होते. जोतीरावापेक्षा त्यांच्या पत्नीचे कौतुक करावे तेवढे थोडेच होईल तिची योग्यता काय सांगावी?

स्त्री शिक्षणाबरोबर अस्पृश्य महार-मांग मुलांसाठी १८५१ मध्ये पुण्यात भोकरवाडी येथे पहिली शाळा स्थापन केली. १८५८ मध्ये मागासलेल्या जा-तीतील विद्यार्थ्यांसाठी जोतीरावांनी आपल्या घराशेजारी एक वस्तीगृह काढले. १८५५ मध्ये त्यांनी रात्रीच्या शाळेची स्थापना केला. त्यांचे सहकारी कृष्णराव भालेकरांनी सुद्धा रात्रीच्या शाळा काढल्या होत्या. १८८२ साली हंटर कमिशनला एक निवेदन सादर केले. त्यामध्ये त्यांनी भारतातील एकूणच शिक्षणाची परिस्थिती सादर यावर विस्तृत विवेचन केले. ते आज घडीला सुद्धा लागू पडतात.

बहुजन समाजाच्या दु:खाची कवरणमिमांसा करताना महात्मा जोतीराव फुले यांनी शेतकऱ्याच्या असूड मध्ये म्हटले की, विद्येविना मति गेली, मती विना निती गेली, निती विना गति गेली, गति विना वित्त गेले,वित्ताविना शुद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले. अविद्येने काय नाही केले, शिक्षणाअभावी शेतकऱ्यांची शुद्धातिशुद्रांची सारा सारं विचार करण्याची शक्तीच नष्ट झाली. त्यामुळे बुद्धीचा विकास झाला नाही. बुद्धिहिन जनावराइतकी सुद्धा किमत नसते. त्यामुळे त्याची समाजातील पत जाते.

आर्थिक परिस्थिती बिघडते. तो दिशाहीन होतो. हीन-दीन बनतो, हे फक्त एका शिक्षणाच्या अभामुळे होते. हे जोतीरावांना कळले होते. जोतीराव काही शिक्षीत, उच्च विभुषीत असे शिक्षणतज्ञ नव्हते, परंतु ते समाज शिक्षक होते. त्यांनी उच्च जातीच्या वर्चस्वाची नाडी ओळखली होती. आणि म्हणूनच त्यांनी शिक्षणप्रसार, प्रचार व विचार पेरण्याचा जोरकस प्रयत्न केला.

शिक्षण नसले तर आर्थिकदृष्ट्या सधन असणाऱ्या राजे-राजवाडे आणि सत्ताधिशांना सुद्धा झळ बसते, हे स्पष्ट करताना महात्मा फुले म्हणतात, अलीकडच्या दास शेतकऱ्यापैकी सातारकर शिव-ाजी महाराज, बडोदेकर दत्त-ाजीराव गायकवाड, ग्वाल्हेरकर पाटीबुवा, इंदूरकर लाख्या बार-गीर, यशवंतराव व विठोजीराव होळकरांसारख्या बडे-बडे रणशूर राजे राजवाड्यांविषयी थोडासा विचार करुन पाहिल्याबरोबर, ते अक्षरशुन्य असल्यामुळे त्याजवर व त्यांच्या घराण्यावर अनर्थ कोसळले हे सहज तुमच्या लक्षात येईल, वास्तव त्याविषयी तुर्त येथे पुरे करीतो. जोतीरावांचे हे निरीक्षण किती अचूक होते हे दिसून येते. म्हणूनच तर जोतीरावांना ज्यांच्या नावाने शिक्षक दिन साजरा होतो त्यांचेही बाप म्हणावे लागेल. एवढी तळमळ त्यांना बहुजनांच्या शिक्षणविषयी होती ऐवढी मोठी त्यांची योग्यता होती.

शेतकऱ्यांच्या संबंधी, त्यांच्या मुलांसंबंधी शिक्षणाचे महत्व अधोरेखित करताना जोतीराव म्हणतात तुम्ही आपले मुले जर आपआपल्या शाळेत पाठविले नाहीत तर ती मुले आळसामुळे उनाड होतील आणि पोटे जाळण्याकरिता चोऱ्या करु ला-गतील. जोतीरावांची भाषा बेधडक, सरळ, सोपी व सहज कळणारी होती. त्याच कुणाचाही हा मुलाहिजा नव्हता. शिक्षणामुळे होणारी प्रगती व शिक्षणाअभावी होणारी अधोगती या दोन्हीचेही ज्ञान त्यांना होते. अशाप्रसंगी स्वकीय दुखावले तरी त्यांनी त्याची पर्वा केली नाही.

शुद्रतिशुद्रांच्या धर्माच्या नावाखाली होणारी पिळवणूक त्यांच्या धर्मविषयक असलेल्या अज्ञानामुळेच होते. धर्म सत्ता राबविणारे आणि राजसत्ता राबविणारे एकत्र आल्यास शो-षणास पारावर उत्तर नाही. हा इतिहास त्यांना ज्ञान होता. त्यासाठी शिक्षण हेच मुख्य अस्त्र आहे हे जोतीरावांना कळले होते. म्हणूनच फक्त उच्चवर्गाला राज्यकर्त्यांनी शिक्षण देवू नये तर कनिष्ठ वर्गाचाही विचार करावा, असा विचार त्यांनी मेकॉलेच्या झिरपण्याच्या सिद्धांताला विरोध करताना मांडला हा सिद्धांत जातव्यवस्था बळकट असणाऱ्या भारतात यशस्वी होणे शक्य नाही. जोतीरावांचे अवलोकन किती डोळस, अचूक होते. यावरुन कळते. जोतीरावांनी येथील शिक्षणाचा विचार करताना असा एकही काना-कोपरा सोडला नव्हता. ज्याचा विचार त्यांनी केला नसेल. प्रत्येक पैलूंवर त्यांनी प्रकाश टाकला होता. त्यावर आजही चिंतन-मनन होणे गरजेचे आहे.

महात्मा जोतीराव फुलेंच्या कार्याचे दृष्टेपण पुढील त्यांच्या शिक्षणासंबंधी असलेल्या विच-ारावरुन दिसून येते. शे-सव्वासे वर्ष झाल्यानंतर सुद्धा, जोतीरावांनी ज्या बाबींचा विचार त्यावेळी केला. त्याचा विचार आजही करावा लागतो. त्यांनी मुलांच्या शिक्षणाविषयीची कल्पना, शिक्षकांचे प्रशिक्षण, वेतन, बहुजनांसाठी बहुजन शिक्षक, ग्रामीण व शहरी अभ्यासक्रमाचे स्वरुप,भाषेचे त्रीसुत्री धोरण, शिक्षणाचे माध्यम, सक्तीचे प्राथमिक सार्वत्रिक शिक्षण, शाळांची तपासणी, व्यवस्थापन, शिष्यवृत्ती व बक्षीसाची योजना, देशी शाळांची आवश्यकताल, उच्चशिक्षणाचे स्वरूप, उच्चशिक्षणाला दिले जाणारे अनुदान, उच्चशिक्षणाचे व्यवस्थापन, उच्चशिक्षणाचा अभ्यासक्रम, खाजगी परीक्षेची आवश्यकता, शिष्यवृत्यांचे स्वरूप, सरकारच्या शैक्षणिक धोरणाची चिकित्सा, शिक्षण संस्थेचे व्यवस्थापन, धार्मिक शिक्षण, स्त्रीशिक्षण, शेतकऱ्याचे शिक्षण, अस्पृश्यांसाठी शिक्षण, इत्यादी पैलुसंबंधी त्यांनी चौफेर विचार मांडला म्हणूनच ते भारतातील शिक्षणाचे आद्यजनक ठरतात.

महात्मा जोतीराव फुलेंच्या कार्य आणि विचाराचे उपयोजन काय? याचा विचार करता, एक गोष्ट स्पष्ट होते की, जोतीराव फुले प्रथम समस्या, अर्थ प्रश्न, समजून घेऊन त्यावर मते मांडतात. फक्त समस्या मांडत नाहीत तर त्यांची उकल करुन, त्यावरील उपाययोजनांची सामुग्री पुरवितात आणि शेवटी तशी कृतीसुद्धा करतात. समस्या, उपाय आणि कृती ही लोकवैद्याची त्रीसुत्री हेच जोतीरावांच्या कार्याचे मोठेपण, तसे करण्यास ते शासन-प्रशास-नास बाध्य करतात. यामागे त्यांची सचोटी, निष्ठा व सत्यता असते.


आजघडीला या सर्व पैलुंवर विचार करणे गरजेचे आहे. शेतकरी, शेतमजूर, कामगार, वाडे,पाडे, वस्त्या, ग्रामीण, शहरी विभागातील मुला-मुलींच्या शिक्षणाचे प्रश्न बिकट बनत चालले आहे. शासन शिक्षणावरचा खर्च दिवसेंदिवस कमी करीत आहे. प्राथमिक सरकारी शाळा बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. शिक्षकांकडे अशैक्षणिक कामे लादल्या जात आहे. त्यातही बहुजन शिक्षक आपली जवाबदारी टाळत आहेत. शिक्षणाचे बाजारीकरण झालेले आहे. उद्या बहुजनांची मुले कोठे असतील? दलीत, आदिवासी, इतर मागास जातीतील याचा विचार जोतीरावांच्या महापरिनिर्वाच्या सव्वाशे वर्षानंतर सुद्धा करावा लागतो. असे आज वाटते.

# बाबासाहेबांचे शेतीविषयक विचार

सत्याचे, समर्पण भावाचे, दूरदृष्टीचे, बुद्धिमत्तेचे, मानवता-वादी नवविचारांचे, राष्ट्रभक्तीचे, राष्ट्रहिताचे आणि सर्व समाजाच्या कल्याणासाठी आपले जीवन समर्पित करणा-या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य म्हणजे भारताच्या इतिहासातील गौरवशाली पर्व आहे.

भारतीय अस्मितेचे हे प्रतीक आहे. उपेक्षित समाजासाठी त्यांनी अभूतपूर्व योगदान दिले आहे. उपेक्षित, वंचित आणि महिलांनाही सामाजिक समतेचे समान हक्क आणि अधिकार मिळायलाच हवेत, यासाठी आपले जीवन समर्पित करणा-या सामाजिक समतेच्या चळवळीचे उद्गाते, महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह परिषदेतील जाहीरनामा शोषितांच्या मुक्तीचा आणि सामाजिक समतेच्या कृतिशील विचारांचा मंत्रजागर करणारे सामाजिक क्रांतीचे अग्रदूत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३१ वी जन्मोउत्सव भार-तासह सा-या जगभरात साजरी होत आहे. या सोहळ्याच्या निमित्ताने त्यांच्या समतावादी विचारांचा आणि चळवळीचा मागोवा घेतला जाईल. आज कोणत्याही शाळा, कॉलेजात गेलात आणि बाबासाहेबांबाबत विध्यार्थ्यांना किती माहिती आहे हे विचारले, तर यातले तथ्य आढळून येईल. हीच परिस्थिती अनेक भारतीयांची आहे.

मुळात बाबासाहेब एकट्या



महाराष्ट्राचे वा एका समाजाचे नाहीतच, तर संपूर्ण शतकाचे आणि शतकाला माणुसकीची प्रेरणा देणारे ते एक अद्वितैय असे व्यक्तिमत्त्व आहे. यात दुमत असता कामा नये. डॉ. बाबासाहेब शेतक-यांचे कैवारी होते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे घटनेचे शिल्पकार आणि दलितांचे कैवारी म्हणून सर्वपरिचित आहेत. तथापि, ग्रामीण भागाचे हितरक्षक आणि शेतक-यांच्या परिवर्तनासाठी त्यांनी मांडलेले विचार फारसे समोर आले नाहीत. त्यामुळे शेतीची हानी झाली. त्यांचे ग्रामीण समाज आणि शेतीबाबतचे विचार आजही राज्यकर्ते, नियोजनकार आणि शेतक-यांसाठी मार्गदर्शक ठरणारे आहेत. या ठिकाणी मला असे गंभीरपणे म्हणावेसे वाटते की, बाबासाहेबांना सर्वांनीच सोयीने वापरले आहे. अगदी त्यांच्याच म्हणणा-या अनुयायांनीही. जगात आदर्श ठरलेल्या सर्वात मोठ्या आणि सर्वसमावेशक अशा लोकशाहीची मूल्ये ज्या संविधानावर उभी आहेत ते संविधान लिहिण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. असे असताना या इतक्या सहज उल्लेखाशिवाय बाबासाहेबांची कर्तबगारी, त्यांनी दिलेली राजकीय, सामाजिक शिकवण आज आपण सोयीने बाजूला करतो ही बाब नज-रेआड करून चालणार नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना ग्रामीण समाजव्यवस्थेची प्रचंड जाण होती. तितकेच शेतीबद्दलही भान होते. ग्रामीण भागात विखुरलेला सम ाज एकसंध करायचा, तर शेतीचे चित्र बदलले पाहिजे, याबाबत ते आग्रही होते. आपल्या देशातील शेतकरी आणि राज्यकर्ते यांच्या उदरनिर्वाहाचे साधन म्हणजे शेती अशी मानसिकता आहे. बाबासाहेबांचा या मानसिकतेलाच आक्षेप होता. शेती हे केवळ उपजीविकेचे साधन नसून, राष्ट्रीय उत्पन्नाचा स्रोत आहे. ग्रामीण भागाच्या आर्थिक विकासाचा केंद्रबिंदू आहे. शेतक-यांसह अनेक शेतमजुरांना रोजगार देण्याचे माध्यम आहे. त्यामुळे शेतीकडे उद्योग म्हणून बघण्याचा दृष्टिकोन असला पाहिजे, याबाबत ते आग्रही होते. शेती विकसित होऊन शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम बनला, तर ग्राम ीण भागात आर्थिक परिवर्तन घडेल. राष्ट्राची अर्थव्यवस्थाही मजबूत होईल. रोजगारासाठीची स्थलांतरे टळतील. इतक्या दूरदृष्टीने व सख-ोलतेने त्यांनी शेतीकडे बघितले. शेतक-यांच्या शोषणाबाबतदेखील त्यांनी परखड विचार मांडले आहेत.

शासनाकडून पुरेसे आर्थिक पाठबळ न मिळाल्याने, शेतकरी सावकारांचा आधार घेतात. सावकारांच्या पाशातून नंतर त्यांची अंतापर्यंत सुटका होत नाही. शेतीतल्या “खोती' पद्धतीबद्दलही त्यांनी कडक शब्दांत भाष्य केले. कष्ट शेतक-याने करायचे आणि खोतक-यांनी फुकटचे खायचे, त्यांना मान्यच नव्हते. सावकार आणि खोतांना ते “आयत्या बिळावरचे नागोबा' असे संबोधित. इतक्या मोजक्या आणि शेलक्या शब्दांत त्यांनी सावकारी व्यवस्थेचे वाभाडे काढले. या व्यवस्थेला हद्दपार करण्यासाठी शासनाने शेतक-यांना बियाणे, खते, पाणी आणि पीक जोप-ासना खर्च दिला पाहिजे. शासनाला महसूल देणा-या शेतीचे आर्थिक उत्तरदायित्व शासनाने उचलावे. “उदरदायित्व' या शब्दातून शास-नाने शेतक-याचे पोशिंदा म्हणून असलेले ऋण फेडावे असे त्यांना अपेक्षित होते. यातून शेतक-यांचे कैवारी म्हणणा-या आजच्या शासनकर्त्यांनी बोध घेण्याची गरज आहे. शेती व्यवसायाचा संबंध त्यांनी समाजव्यवस्थेशी जोडला होता. ग्रामीण भागातील जातीवर आधारित समाज व्यवस्थेचे कारण त्यांनी ग्रामीण आर्थिक व्यवस्थेमध्ये शोधले होते. त्यामुळेच जातीवर आधारित समाजव्यवस्था बदलायची, तर त्यासाठी शेतीमध्ये परिवर्तन घडवावे लागेल. शेतीला उद्य-ोग मानून पायाभूत सुविधा पुरवून शेतक-यांचा आर्थिक विकास झाला पाहिजे. शेतकरी आर्थिकदृष्ट्या समृद्ध झाला, तर शेतमजूर आणि शेतीशी निगडित सर्वच घटकांना या आर्थिक सक्षमतेचा फायदा होईल. आर्थिक स्रेत तळागाळापर्यंत झिरपले म्हणजे ग्रामीण माणसाच्या मानसिकतेत सकारात्मक बदल घडतील. हे बदल सामाजिक परिवर्तनासाठी पोषक ठरतील. आर्थिक विषमता ही जातीय व्यवस्थेला पूरक व पोषक ठरते.

आर्थिक विषमता जितकी कमी होईल, तितकी जातीय भेदभावाची दरी कमी होईल, असे बाबासाहेबांना वाटत होते. शेतीसाठी जमीन व पाणी हे मुख्य घटक आहेत. पाण्याशिवाय शेतीचा विकास अशक्य आहे. शेतक-याला शाश्वत पाणी मिळणे गरजेचे आहे. पाण्याशिवाय उत्पादकता वाढणे आणि शेतक-यांचा आर्थिक स्तर उंचावणे शक्य नाही, हे त्यांनी ब्रिटिश सरकारच्या निदर्शनास आणून दिले होते. शेतीला शाश्वत पाणी पुरविण्यासाठी नदीच्या पाण्याचे नियोजन झाले पाहिजे. दे-शात घडणारे दुष्काळ हे मानवनिर्मित आहेत. दुष्काळ हटवायचा तर दुष्काळात पाण्याचे नियोजन करावे. जिरायती शेती, बागायती करण्याचे प्रयत्न वाढवावेत. शेती व शेतमजूर समृद्ध झाला तरच देश समृद्ध होईल, असे मौलिक विचार त्यांनी मांडले. पाण्यासंदर्भात केवळ विचार व्यक्त न करता त्यांनी ब्रिटिश सरकारला, नदीच्या खो-यातील पाण्याच्या नियोजनाची योजना सादर केली.

ही योजना “दामोदर खोरे परियोजना' म्हणून ओळखली जाते. आपल्या शासनाने १९९६ मध्ये कृष्णा, गोदावरी, तापी, नर्मदा अशी खो-यांची विभागणी केली. यावरून डॉ. बाबासाहेब यांच्या दूरदर्शीपणाची लांबी व खोली लक्षात येते. डॉ. बाबासाहेबांनी सर्वात महत्त्वाची संकल्पना मांडली ती “शेतीचे राष्ट्रीयीकरण' करण्याची. शासनाने शेतजमिनी ताब्यात घेऊन, त्या विकसित कराव्यात, अशा विकसित शेतजमिनी शेतक-यांना काही अटींवर कसण्यासाठी द्याव्यात. हा एका अर्थाने सामुदायिक शेतीचाच प्रयोग होता. अशी शेती करण्यासाठी शासनाने अधिनियम बनवावेत.

पीक पद्धती, पाणी उपलब्धता, बांधबंदिस्ती, उत्पादकता वाढ, साठवण व्यवस्था, शेतमालाची विक्री, शेतमालाचे भाव या संदर्भात स्पष्ट नियम करावेत. यामुळे कोणत्याही एकाच पिकाखाली मोठे क्षेत्र येऊन, शेतमालाच्या उपलब्धतेत विषमता येणार नाही. मागणी व पुरवठा या अर्थशास्त्रीय नियमानु-सार, शेतमालाला रास्त भाव मिळेल. त्याचबरोबर अतिरिक्त उत्पादनामुळे होणारे शेतमालाचे नुकसानही टळेल. आजही शेतक-यांच्या शेतमालाला रास्त भाव मिळावा यासाठी शासनाशी झगडावे ला-गते. या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेतीसाठी अधिनियम व कायदा असावा ही संकल्पना शेतक-यांसाठी किती मोलाची आहे, हे अधोरेखित होते. बाबासाहेबांच्या संकल्पनेतूनच कमाल जमीनधारणा कायदा, सावकारी व खोती पद्धतींना प्रतिबंध करणारा कायदा, सामूहिक शेती प्रणालीवर आधारित शेती महाम ंडळ, राज्यातील नद्या-खो-यांची विभागणी व विकास, जलसंवर्धन योजना अंमलात आल्या. शासनाने त्याबाबत कायदे व नियम बनविले. यामागे बाबासाहेबांच्या विचारांचाच प्रभाव दिसून येतो.

डॉ. बाबासाहेब यांचे शेतीबाबतचे विचारधन राज्यकर्ते नियोजनकार व शेती तज्ज्ञांनी अभ्यासले पाहिजेत. दुर्दैवाने अनेकांना डॉ. बाबासाहेब हे शेतक-यांचे कैवारीदेखील होते, हे अजूनही ठाऊक नाही. त्यांच्या विचारांच्या उपेक्षेतून शासनकर्त्यांची उदासीनताच प्रकर्षाने दिसते. सत्याचे, समर्पण भावाचे, दूरदृष्टीचे, बुद्धिमत्तेचे, नवविचारांचे, राष्ट्रभक्तीचे, राष्ट्रहिताचे, मानवतेचे सर्व समाजाच्या कल्याणाचे दर्शन घडविणारे बाबासाहेब ज्ञानयात्री, विश्वयात्री होते. या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब यांच्या शेतीविषयक सूचनांची अंमलबजावणी केली, तर शेती व ग्रामीण भागाचे परिवर्तन घडेल. राज्यात होत असलेल्या शेतक-यांच्या आत्महत्या, शेतीसम ेरचे प्रश्न यांचा विचार केला, तर आजही या प्रकाशयात्रीचे स्मरण प्रेरणादायी ठरणारे आहे. या युगप-ुरुषाला विनम्र अभिवादन!

विनोद धोंगडे नैनपुर

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायक्षेत्र)

# सर्वात मोठ्या गुफेला अनास्थेचा दंश

**गोंदिया:** जिल्ह्यात कचारगड ही प्राचीन व नैसर्गिक गुफा आहे. आशिया खंडातील सर्वात मोठी गुफा म्हणून ही ओळखली जाते. मात्र, शासनाचे याकडे दुर्लक्ष आहे. त्यामुळे येथील विकास झालेला नाही. परिणामी, पर्यटक येत नाहीत. त्यामुळे येथील विकास झाल्यास नक्कीच पर्यटक येतील. शिवाय शासनाच्या महसूलातही वाढ होईल, असे येथील ग्रामस्थांचे मत आहे.

छत्तीसगड, मध्यप्रदेश राज्याच्या सीमेवर गोंदिया जिल्ह्यात नैसर्गिक निर्मित कचारगड गुफा आहे. ही आशिया खंडातील सर्वात मोठी गुफा म्हणून ओळखली जाते. मात्र, पर्यटन व पुरातन विभागाचे याकडे लक्ष नाही. त्यामुळे ही गुफा आज विकासापासून कोसो दूर आहे. शासनाने याकडे लक्ष दिले तर जिल्ह्यातीलच नव्हे तर विदर्भातील सर्वात मोठे पर्यटन केंद्र आणि तीर्थस्थळ म्हणून ओळखले जाऊ शकते. गोंदिया जिल्हा नैसर्गिक वनसंपदेने नटलेला आहे. गोंदिया जिल्हा म्हणजे महाराष्ट्राचे पुर्वद्वार म्हणून ओळखले जाते. जिल्ह्यात कचारगड गुफा, नागझिरा अभयारण्य, प्रतापगड, बोदलकसा, नागरा धाम, हाजराफाल ही मोठी पर्यटन व तीर्थस्थळे आहेत. प्रत्येकवर्षी या तीर्थ स्थळावर यात्रा भरते.

हजारोंच्या संख्येत व्याघ्र दर्शनासाठी पर्यटक नागझिरा अभयारण्यात येतात. पर्यटकांना आशिया खंडातील सर्वात मोठी गुफा कचारगड या तीर्थ स्थळाची पुरेशी माहिती नाही. त्यामुळे पर्यटक या गुफेच्या दर्शनापासून वंचित राहतात. कचारगड गुफा संदर्भात माहिती घेण्यात आली असता याविषयी अनेक आश्चर्यचकित करणाऱ्या गोष्टी समोर आल्या आहेत. कचारगड गुफा प्राचीन काळापासून नैसर्गिक निर्मित आहे. या गुफेतून आदिवासी गोंडीयन धर्माचे संस्थापक पारी कुपार लिंगो यांनी धर्मप्रचार सुरु केला होता. तेव्हापासून या गुफेला आदिवासींचे उमगस्थान संबोधले जाते. अतिशय घनदार जंगलात ही गुफा आहे. त्यामुळे या गुफेला नैसर्गिक सौंदर्य प्राप्त झाले आहे. या परिसरात विविध गंभीर आजारांवर उपयोगात येणारी वनऔषधी झाडे पहायला मिळतात.



## १६ राज्यातील लाखो आदिवासींची हजेरी

**कचारगड गुफेत एक मोठी निसर्गनिर्मित विहिरसुद्धा आहे. या विहिरीतील पाणी १०० टक्के शुद्ध असल्याचे बोलले जाते. या गुफेच्या काही अंतरावरच आणखी एक नैसर्गिक मोठी गुफा आहे. या गुफेत प्रवेश करण्यासाठी कमीत कमी ४ ते ५ किलोमीटर अंतर पायी डोंगरावर चढावे लागते. प्रत्येकवर्षी या कचारगड यात्रेला १६ राज्यातील आदिवासी बांधव लाखोंच्या संख्येने हजर राहतात. मात्र येथे सुविधांचा अभाव असल्यामुळे पर्यटकांच्या चेहऱ्यावर निराशा दिसून येते. जर शासनाने पर्यटक व तीर्थस्थळाकरिता आवश्यक सुविधा उपलब्ध केल्या तर जिल्ह्यातीलच नाही तर विदर्भातील सर्वात मोठे पर्यटन केंद्र व तीर्थस्थळ म्हणून हे स्थान ओळखले जाऊ शकते.**

## पर्यटकांच्या वाढीसाठी या सुविधांची गरज

**कचारगड गुफेच्या दर्शनासाठी पर्यटकांना सुविधा उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. त्यामुळे पर्यटकांचा येथे येण्याचा ओघ निश्चितच वाढू शकतो. त्यासाठी कम्युनिटी हॉल, म्युझियम, शौचालय, ग्रंथालय, गोटुल शिक्षा केंद्र (आदिवासी बोलीभाषा प्रशिक्षण केंद्र), विश्राम गृह, गार्डन, पिण्याच्या पाण्याची सुविधा, ब्रिज कम बंधारा (खाली बंधारा व वर पूल) प्ले ग्राऊंड, हॉटेल, रस्ते आदी सुविधा उपलब्ध होणे गरजेचे आहे. मात्र, शासनाचे व पुरातत्व विभागाचे याकडे गंभीरपणे लक्ष नाही. त्यामुळे सुविधांचा अभाव आहे. तरी शासनाने या सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात. अशी मागणी पारिकुमार लिंगो माँ काली कंकाली देवस्थान समिती कचारगड धनेगाव यांनी केली आहे.**

# आरटीईत घुसखोरी कुणाची?




## रप्रवेश मिळणे अवघड

**राज्यातील अनेक जिल्ह्यात उपलब्ध जागांपैकी तिपटीने अर्ज आले आहेत. त्यामुळे गरजू कुटुंबातील मुलांना आरटीईतून प्रवेश मिळणे अवघड झाले आहे. लॉटरी दरम्यान किंवा प्रवेशाच्या वेळी प्रमाणपत्रांच्या छाननीवर कसून कार्यवाही केल्यास हा प्रश्न सुटू शकणार आहे, मात्र यासाठी शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांचाही कस लागणार असल्याचे मत तज्ज्ञ व्यक्त करीत आहेत.**

**गोंदिया:** शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि वंचित घटकांमधील दुर्बल आणि वंचित घटकांमधील शिक्षणासाठी शिक्षणहक्क मुलांच्या शिक्षणासाठी कायद्यांतर्गत (आरटीई) राबविण्यात येणाऱ्या प्रवेश प्रक्रियेला नागपूरसह राज्यात मिळणारा प्रतिसाद पाहुण, या प्रक्रियेत आर्थिदृष्ट्या सक्षम असणाऱ्या पालकांकडून उत्पन्नाच्या दाखल्यांमध्ये आणि त्याचबरोबर नामवंत शाळेजवळच्या एक किमी परीसरात राहत असल्याचे आधार कार्डात फेरफार करुन अर्ज भरण्यात येत असल्याची शंका व्यक्त होत आहे. त्यामुळे गरीब कुटुंबातील मुले प्रवेशापासून वंचित राहण्याची शक्यता आहे.

शिक्षण हक्क कायदाअंतर्गत नामांकीत खासगी इंग्रजी शाळांमध्ये २५ टक्के जागांवर गरीब, वंचित व दुर्बल घटकातील बालकांना मोफत प्रवेश दिला जातो. शैक्षणिक सत्र २०२३-२४ करिता १ ते २५ मार्च दरम्यान पालकांनी ऑनलाईन अर्ज सादर केले. जिल्ह्यातील ८६४ जागांसाठी ३९५९ अर्ज केले. पहिली सोडत (लॉटरी) बुधवार ५ एप्रिल रोजी पुणे येथे विद्यार्थ्यांया हस्ते काढण्यात आली. निवड झालेल्या बालकांच्या पालकांना बुधवार १२ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजेनंतर नोंदणी केलेल्या मोबाईल क्रामांकावर संदेश (एसएमएस) पाठविले जाणार आहे. आरटीई (RTE) अंतर्गत शैक्षणिक सत्र २०२३-२४ करिता गोंदिया जिल्ह्यात १३१ शाळांमध्ये ८६४ जागा निर्धारीत आहेत. त्यासाठी ३ हजार ९५९ ऑनलाईन अर्ज सादर झाले होते. गतवर्षी जिल्ह्यात ८४२ जागा राखीव होत्या. बुधवार ५ एप्रिल रोजी महाराष्ट्राच्या राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे येथे पहिली सोडत (लॉटरी ) काढण्यात आली. यावेळी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे सचिव रणजितसिंह देओल, शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांच्यासह विविध शैक्षणिक संघटनांचे प्रतिनिधी, पालक, पत्रकार उपस्थित होते. ते लॉटरी अंतर्गत निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांना येत्या बुधवार १२ एप्रिलपासून संदेश (एसएमएस) प्राप्त होतील. निवड झालेल्या बालकांच्या पालकांनी १३ ते २५ एप्रिल दरम्यान पंचायत समिती, नगरपालिका स्तरावरील पडताळणी समितीकडे जाऊन कागदपत्रे तपासून घेत त्यांच्या पाल्याचा प्रवेश निश्चित करावा. पडताळणी समितीने प्रवेश निश्चित केल्यानंतर पालकांनी ३० एप्रिलपर्यंत शाळेत जाऊन बालकांचा प्रवेश घ्यावा लागेल

अर्जाच्या अंतिम स्थितीनुसार राज्यातील १ लाख १ हजार ९६९ जागांसाठी प्रवेश क्षमतेच्या तीन पटींहून अधिक म्हणजे तब्बल ३ लाख ६५ हजार अर्ज आले आहेत. यामुळे निश्चित गरजू व्यक्तींच्या मुलांना प्रवेश मिळणे अवघड झाले आहे. आरटीई अंतर्गत खासगी शाळांमध्ये राखीव असणाऱ्या २५ टक्के जागांवर आर्थिक दुर्बल आणि वंचित होतो, मात्र, या प्रक्रियेत उत्पन्नाच्या अटींमध्ये शिथिलता आल्यामुळे, अर्जांच्या संख्येत वाढ झाल्याचे निरीक्षण अभ्यासकांनी नोंदविले आहे. सध्याच्या प्रक्रियेत खुल्या प्रवर्गासाठी एक लाख उत्पन्नाची अट आहे, राखीव प्रवर्गासाठी उत्पन्नाची अट नाही. या पार्श्वभूमिवर सधन कुटूंबातील व्यक्तीकडून उत्पन्नाच्या दाखल्यांमध्ये फेरफार करून एक लाखाच्या आतील दाखले तयार करण्यात येत आहेत.

पाल्याला नामवंत शाळेत प्रवेश मिळावा याकरिता आधार काडातील रहिवासी पत्ता बदविलण्यात आले असल्याची शंका व्यक्त केली जात आहे. अशाप्रकारे समाजातील सर्वच स्तरातील कुटुंबामधील प्रवेश प्रक्रियेत अर्ज भरण्यात येत असल्याची शंका व्यक्त होत आहे. त्यामुळे गरीबांना प्रवेश मिळणार नसल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे खाजगी व्यक्तीच्या हवाली करण्यात आलेली समिती संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे.

## पंचायत समिती सदस्य संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी अनिल बिसेन



**गोंदिया:** - पंचायत समिती सदस्य संघटनेच्या अध्यक्षपदी देवरी पंचायत समितीचे उपसभापती अनिलकुमार बिसेन यांची सवार्नुमते निवड करण्यात आली. तर सचिवपदी आम गाव पंचायत समितीचे पंचायत समिती सदस्य इंजिनीयर तारेन्द्र रामटेके व जिल्हा संघटक म्हणून गोरेगाव पंचायत समितीचे सभापती मनोज बोपचे यांची निवड करण्यात आली.

संघटनेच्या जिल्हा उपाध्यक्षपदी गोंदिया पंचायत समितीचे सदस्य शंकरलालजी टेंभरे, सडक अर्जुनी पंचायत समितीचे उपसभापती कापगते, महिला उपाध्यक्षपदी सालेकसा पंचायत समितीच्या सदस्या अर्चना ताराम यांची निवड करण्यात आली. कोषाध्यक्ष म्हणून सालेकसा पंचायत समितीचे पंचायत समिती सदस्य जितेंद्र बल्हारे यांची निवड करण्यात आली. दरम्यान नगर परिषद व जिल्हा परिषदेच्या धतीवर पंचायत समिती गटामधून सुद्धा महाराष्ट्रामध्ये चार आमदार पाठविण्यात यावे, पंधरावा वित्त आयोगमध्ये २० टक्के निधी हा पंचायत समितीला असावा, ७० टक्के ग्रामपंचायतीला व १० टक्के जिल्हा परिषदेला निधि देण्यात यावे आदी विषयावर चर्चा करण्यात आली.

# पिसाळलेल्या कुत्र्याचा वासरासह १२ जणांना चावा

**गोंदिया** : पिसाळलेल्या एका बेवारस स्वानाने १२ जणांसह एका वासराचा चावा घेतला. या घटनेने नागरिकांत भितीचे वातावरण आहे. ही घटना शहरातील सुर्याटोला येथे शुक्रवार ७ एप्रिल रोजी सकाळी १० वाजेच्या सुमारास घडली.जखमिंवर स्थानिक रुग्णालयात उपचार करण्यात आले.सर्व जखमी धोक्याबाहेर असून त्यांना घरी पाठविले. शहरासह परिसरात बेवारस स्वानांचा उपद्रव वाढला आहे.लहान मुलांसह वृद्धांवर हल्ल्यांच्या घटना वाढल्या आहेत. अनेकदा हे स्वान समुहाने हल्ला करीत असल्याचे दिसून आले आहे.गत महिन्यात शहरात एका ९ वर्षीय बालकावर डुकराने हल्ला केला.


## ग्रामपंचायत कार्यालय झाशीनगर

**पंचायत समिती अर्जुनी/मोर., जिल्हा परिषद, गोंदिया**

निविदा सुचना क्रमांक १/सन २०२२-२३

ग्रामपंचायत झाशीनगर ता.अर्जुनी/मोर.च्यावतीने खालील कामाच्या निविदा दोन लिफाफा पद्धतीने जिल्हा परिषद गोंदिया/भंडारा कडील योग्य त्या वर्गातील पंजीबद्ध कंत्राटदाराकडून निविदा मागवण्यात येत आहे.

| कामाचे नाव | कामाची किंमत लाखात | निविदा विक्री किंमत | निविदा सोबत भरावयाची अग्रीम सुरक्षा १% | कामाचा कालावधी | कंत्राट धारकाची वर्गवारी |
|---|---|---|---|---|---|
| १)100%PHTC TO WATER SUPPLY SCHEME AT-ZASINAGER (जल जीवन मिशन २०२१-२२) | ७,७५,४५०/- | १००/- | ७७५५/- | ६ महिना | वर्ग १ ते ९ |

**निविदा प्रसिद्धी तपशील**

१) निविदा विक्री व स्वीकृती १२/०४/२०२३ सकाळी १०.०० ते १८/०४/ २०२३ दुपारी ०५.०० वाजेपर्यंत २) तांत्रिक लिफाफा उघडून कागद पत्राची तपासणी १९/०४/ २०२२. ३) निविदा उघडणे १९/०४/२०२३ दुपारी १२.०० वाजता. किंवा ग्रा.पं.च्या सोयीनुसार. ४) बी १ फॉर्म ग्रामपंचायत कार्यालयामध्ये उपलब्ध राहील. ५) निविदेच्या अटी व शर्ती ग्रा.पं.झाशीनगर च्या नोटीस बोर्डवर लावण्यात येतील.

**सरपंच**
ग्रामपंचायत झाशीनगर

**ग्रामसेवक**
ग्रामपंचायत झाशीनगर


# जेईई, नीटच्या ओबीसी प्रशिक्षणार्थी संख्येला कात्री

## महाज्योतीच्या निर्णयाविरोधात विद्यार्थ्यांमध्ये नाराजी

**नागपूर:** जेईई आणि नीट परीक्षांसाठी तयारी करुन घेतल्या जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या महाज्योती ने १५ हजारांवरुन साडेसहा हजारापर्यंत खाली आणली आहे. त्यामुळे उर्वरित विद्यार्थी प्रशिक्षणाला मुकणार असल्याने याबाबत नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

ओबीसी, व्हीजेएनटी आणि एसबीसी प्रवर्गातील विज्ञान शाखा घेऊन शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या बघता अधिकाधिक विद्यार्थ्यांना जास्तीत-जास्त लाभ पोहोचवण्याचा प्रयत्न शासकीय, निमशासकीय यंत्रणांनी करणे अपेक्षित आहे. गतवर्षी संचालक मंडळाने १५ हजार ओबीसी विद्याथ्यजेईंना प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेतला. ओबीसी लोकसंख्येच्या आधारे त्यात यंदा २० हजारापर्यंत वाढ अपेक्षीत होती. मात्र जेईई नीट २०२५ साठी विद्यार्थी संख्या साडेसहा हजारापर्यंत खाली आणण्यात आली आहे. महाज्योतीने ओबीसी प्रशिक्षणार्थीची संख्या कमी केल्यामुळे ओबीसी समाज व विद्यार्थ्यांकडून संताप व्यक्त होत आहे. महाज्योतीचे माजी संचालक प्रा. दिवाकर गमे यांनी प्रशिक्षणार्थींची संख्या २० हजार करण्याची मागणी केली आहे. तर दोन वर्षातील प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या १३ हजार १०० आहे. त्यामुळे संख्या कमी करण्यात आली असे म्हणणे चुकीचे असल्याचा दावा महाज्योती चे व्यवस्थापकीय संचालक राजेश खवले यांनी केला.

महाज्योती
ज्ञानदीप समतेचा

### महाज्योतीची निवडप्रक्रिया

महाज्योती या प्रवेश परीक्षापूर्व प्रशिक्षणासाठी स्थापन झालेल्या शासनाच्या स्वायत्त संस्थेमार्फत गावखेड्यात राहणाऱ्या गोरगरीब तसेच शहरातील गुणवंत ओबीसी विद्यार्थ्यांसाठी जेईई आणि नीट च्या तयारीचे प्रशिक्षण दिले जाते. दहावीत चांगले गुण घेऊन ११ वी विज्ञान शाखेला प्रवेश करणाऱ्यांची निवड यासाठी करण्यात येते. त्यांना १८ महिने मोफत ऑनलाईन प्रशिक्षण दिले जाते. त्यासाठी मोफत टॅब व दररोज सहा जीबी विदा आणि मोफत पुस्तके दिली जातात.



## रेशन दुकानदारांचे जंतर-मंतरवर आंदोलन

**सालेकसा** : स्वस्त धान्य पुरवठा व अन्न पुरवठा विभागांतर्गत शिधावाटप दुकानदार (स्वस्त धान्य दुकानदार) अनेक दिवसांपासून गावोगावी धान्य वितरण करत आहेत. मात्र स्वस्त धान्य दुकानदार अनेक सुविधांपासून वंचित असून त्यांना त्यांचे योग्य मानधनही मिळत नाही. दरम्यान, संघटनेच्यावतीने दिल्लीतील जंतरमंतर मैदानावरील आंदोलनात तालुक्यासह जिल्ह्यातील रेशन दुकानदारांनी सहभाग नोंदविला.

स्वस्त धान्य दुकानदारांना मासिक १०० रुपये ग्रॅच्युइटी देण्याच्या मागणीसह अन्य मागण्यांना घेऊन दिल्ली येथील जंतरमंतर मैदान येथे आंदोलन करण्यात येत आहे. यात धरणे आंदोलनही करण्यात आले आहे. ज्यामध्ये जिल्ह्यासह सालेकसा तालुक्यातील रेशन दुकानदारांनीही सहभाग घेतला.


## निविदा सुचना
## महाराष्ट्र शासन
## जलसंपदा विभाग

**Main Portal** :http://wrd.maharashtra.gov.in

महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, भंडारा दुरध्वनी क्रमांक (०७१८४) २५०८९५, E-mail:eevhelidb@rediffmail.com हे महाराष्ट्रात नोंदणीकृत असलेल्या परवानाधारक विद्युत कंत्राटदाराकडून खाली नमुद केल्याप्रमाणे कामाच्या ब-१ नमुन्यात त्यांची निविदा निश्चित करण्यासाठी प्रस्तावर मागवित आहेत.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, भंडारा यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. दस्तावेज कार्यकारी अभियंता, विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, भंडारा यांच्या कार्यालयात दि.१०/०४/२०२३ पासून उपलब्ध होवू शकतील.


| अ.क्र. | कामाचे नाव | निविदेची अंदाजित रक्कम | इसारा रक्कम रू. | निविदा उपलब्ध कालावधी | निविदा स्विकृती व उघडणे | प्रत्येक निविदा संचाची किंमत रु.(नापरतावा) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | धापेवाडा उपसा सिंचन योजना टप्पा-२ ता.तिरोडा, जि.गोंदिया येथील १३२/११ केव्ही कळदाब प्रांगणातील ११ केव्ही, २०० केव्हीएआर कॅपासिटर बँक पनलचा पुरवठा,उभारणी, चाचणी व कार्यान्वितीकरणाचे काम **(निविदा क्र.काअ/विजविवउसिंविभं/कॅपासिटर बँक धापेवाडा-२/०१/२०२३-२४** | ५,९१,५७६/- | ६०००/- | दि.१०/०४/२०२३ ते दि.२४/०४/२०२३ | निविदा सादर करणे दि.२५/०४/२०२३ रोजी १२.०० वाजता पर्यंत व शक्य झाल्यास त्याच दिवशी १३.०० वाजता निविदा उघडण्यात येईल. | रू.२३६०/- (नापरतावा) |
| २ | धापेवाडा उपसा सिंचन योजना टप्पा-२ ता.तिरोडा जि.गोंदिया अंतर्गत असलेल्या २२०-१३२ केव्ही कवलेवाडा उपकेंद्र महावितरण) येथे १३२ केव्ही लाईन डिफ्रंशियल रिले, सिटी,आयसोलेटर मार्शलींग बॉक्सचा पुरवठा, उभारणी चाचणी व कार्यान्वितीकरणाचे काम. **(निविदा क्र.काअ/विजविवउसिंविभं/कवलेवाडा धापेवाडा-२/०२/२०२३-२४** | ८,२०,६४१/- | ८३००/- | दि.१०/०४ २०२३ ते दि.२४/०४ २०२३ | निविदा सादर करणे दि.२५/०४/२०२३ रोजी १२.०० वाजता पर्यंत व शक्य झाल्यास त्याच दिवशी १३.०० वाजता निविदा उघडण्यात येईल. | रू.२३६०/- (नापरतावा) |

१. केंद्र शासन, राज्य शासन किंवा स्थानिक संस्था यांनी आकारलेले सर्व कर, शुल्क (जी.एस.टी.वगळून) यांचा उद्धरत दरामध्ये समावेश असावा, **निविदिकारानी जी.एस.टी.वगळून दर उद्धरत करावेत.** स्वीकृत निविदा किमतीवर जी.एस.टी.देय राहील.
जी.एस.टी.**शासनास वेळोवेळी भरण्याची संपूर्ण जवाबदारी कंत्राटदाराची राहील. कंत्राटदाराने जी.एस.टी.कंत्राटदाराने जी.एस.टी.भरणा केलेबाबतची सर्व आवश्यक मुळ कागदपत्रे, पुरावे, पावत्या सादर केल्यानंतर व त्याची आवश्यक खातरजमा या कार्यालयाने केल्यानंतरच त्याची कंत्राटदारास परतफेड करण्यात येईल.**
२. निविदा विषयक थोडक्यात दिनांक निहाय तपशिल खालील प्रमाणे आहे. सविस्तर निविदा सुचना http://wrd.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.
**टीप :-** कोणतेही कारण न देता एक अथवा सर्व निविदा नाकारण्याचा तसेच निविदा प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार निम्म स्वाक्षरीकार यांनी राखून ठेवलेला आहे.

**(ठा.अ.गायधने)**
कार्यकारी अभियंता
विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग,
भंडारा

जिमाका/गोंदिया/जाहिरात ८६/२०२३





# भुमिगत गटार योजनेच्या अनागोंदी कारभार प्रकरणी मागितले स्पष्टीकरण

## जिल्हाधिकाऱ्यांनी घेतली दखल: प्रशासकांना सात दिवसात द्यावे लागणार उत्तर



**गोंदिया:** भूमिगत गटार योजना शहरवासीयांसाठी सध्या डोकेदुखीची ठरु लागली आहे. शहरात खोदकामामुळे होणारे अपघात तसेच वाहतूक कोंडी, रस्त्यांची दुरवस्था याने शहरवासीय त्रस्त झाले आहेत. या योजनेतील अनागोंदी कारभारासंदर्भात झालेल्या तक्रारीची दखल घेत जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी नगर पालिकेचे प्रशासक करण चव्हाण यांना ६ एप्रिल रोजी पत्र देऊन यावर सात दिवसात स्पष्टीकरण मागविले आहे.

गोंदिया शहरात १३४.७ कोटी रुपयांची भूमिगत गटार योजना मंजूर झाली. या योजनेचे काम दोन वर्षापुर्वी सुरु झाले. मात्र कामात मोठ्या प्रमाणात अनियमितता होत आहे. वारंवार तक्रार करुन देखील कंत्राटदारावर कुठलीच कारवाई प्रशासनाकडून करण्यात आली नाही. तर रस्त्यांचे खोदकाम करताना तांत्रिक बाबींकडे दुर्लक्ष करण्यात आले. ही योजना आजघडीला गोंदियाकरांसाठी प्रचंड डोकेदुखीची ठरत आहे. याकडे लक्ष देऊन योजनेच्या कामाची चौकशी





करण्यात यावी, या मागणीचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले होते. त्यावर यापुर्वी जिल्हाधिकारी यांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता यांनी खोटी माहिती सादर केल्याने कारवाई करण्यात यावी, असाही उल्लेख तक्रारीत करण्यात आला आहे. याची जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी दखल घेत येत्या सात दिवसात योजनेंतर्गत सुरु असलेल्या कामाचा आढावा व त्याचे स्पष्टीकरण मुख्याधिकाऱ्यांना मागितले आहे. त्यामुळे मुख्याधिकारी चव्हाण यावर नेमके काय स्पष्टीकरण देतात, याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

निवेदन देणाऱ्या शिष्टमंडळात ॲड. ओमप्रकाश मेठी, गजेंद्र फुंडे, विजय अग्रवाल, देवेश मिश्रा, लोकेश यादव, महेंद्र देशमुख, धर्मिष्ठा सेंगर, शालिनी डोंगरे, सचिन चौरसिया, राजेश कनोजिया, हर्षल पवार, प्रशांत वडेरा, मुजीब बेग व आदेश शर्मा यांचा समावेश होता.

### पोकलेन मशीनने खोदकाम

**भूमिगत गटार योजनेचे काम करताना पोकलेन मशीनने खोदकाम करु नये, असे स्पष निर्देश असताना देखील त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. त्याचबरोबर खोदकाम केल्यानंतर त्या खड्ड्यांचा सिमेंट कॉक्रीटने भराव करण्यात येत नाही. तीन ते पाच इंच कॉक्रीट टाकून वेळ मारुन नेली जात आहे. परिणामी त्या ठिकाणी पुन्हा खड्डे पडून अपघात होत आहेत. आतापर्यंत अनेक इसम जखमी झाले आहेत.**

### भूमिगत गटार योजनेचे वाटेकरी किती

**गोंदिया शहरात मागील काही महिन्यांपासून भूमिगत गटार योजनेचे काम सुरु आहे. या योजनेचे काम हे नियमांना डावलून केले जात असल्याची ओरड होत आहे. तसेच या संदर्भात अनेक तक्रारी करण्यात आल्या. पण यावर कुणी पुढे येऊन बोलायला तयार नाही. त्यामुळे भूमिगत योजनेच्या कामात अनेक वाटेकरी असल्याची चर्चा शहरवासीयांमध्ये आहे.**

# गोरेगाव तालुका सहकारी शेतकी खरेदी विक्री समितीच्या निवडणुकीत एकता विकास व परिवर्तन सहकार पॅनलमध्ये लढत

**गोरेगाव:** गोरेगाव तालुका सहकारी शेतकी खरेदी विक्री समिती मर्या.गोरेगाव, र.नं.२३१ च्या पंचवार्षीक निवडणुकीकरिता येत्या १५ एप्रिल रोजी मतदान होत असून संस्था स्थापनेनंतर पहिल्यांदाच निवडणूक होत आहे. या निवडणुकीत विद्यमान एकता विकास पॅनल रिंगणात असून सहकार परिवर्तन पॅनल सुद्धा रिंगणात उतरली आहे.

एकता विकास पॅनलमध्ये कॉँग्रेस व राष्ट्रवादी कॉँग्रेसचे अधिकृत आघाडी असून सहकार परिवर्तन पॅनलमध्ये भाजप, कॉँग्रेस व राष्ट्रवादीचा एक गट सहभागी आहे. या निवडणुकीकडे तालुक्यातील जनतेचे लक्ष लागले असून या निवडणुकीच्या निकालावरच गोरेगाव तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीचे समीकरण राहणार आहे.

या निवडणुकीत एकता विकास पॅनलच्यावतीने सर्वसाधारण कर्जदार गटातून–कटरे खेमेंद्र हिरदीलाल, कटरे परसराम ग्यानिराम, बारेवार लक्ष्मीचंद दौलतराव,



बिसेन मानिकचंद गोपीचंद, मेंढे मेघश्याम भाष्कर, येळे खिरीचंद नत्थू, रहांगडाले डेमेन्द्र बाबुलाल, रहांगडाले लोकेश नुतनलाल, राठोड राजेंद्र जितसिंह, शेंडे विशाल कृष्णकुमार, महिला राखीव गटातून– गौतम कामिनी किशोर, पटले रेवनबाई रेवलाल, विमुक्त जाती/जमाती किंवा विशेष मागास प्रवर्ग गटातून–तुमसरे यादवराव बिसन, अनुसूचित जाती/जमाती गटातून–कांबळे महेंद्र गादीराम, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था गटातून–कटरे कुवरलाल लक्ष्मीचंद, कुंभलकर देवचंद किशन व इतर मागासवर्ग (ओबीसी) गटातून–मेंढे विवेक चंद्रकुमार हे रिंगणात आहेत.

तर सहकार परिवर्तन पॅनलच्यावतीने सर्वसाधारण गटातून–कटरे ओमप्रकाश शामराव, चव्हाण पृथ्वीराज चुन्नीलाल, ठाकुर पुरणलाल गणपत, नागपुरे आशिष गिरजाशंकर, पटले दिनदयाल छगनलाल,येरोला जगदीश अंजैय्या, येळे रुस्तमलाल प्रेमलाल, रहांगडाले श्रीप्रकाश हेतराम, राखळे कारूजी धोंडुजी,हरिणखेडे रामेश्वर प्रेमलाल, महिला राखीव गटातून– गौतम मालनबाई टेकराम, बघेले जानकीबाई मोहनलाल, विमुक्त जाती/जमाती किंवा विशेष मागास प्रवर्ग गटातून–मेश्राम गिरीजाशंकर लहु, अनुसूचित जाती/जमाती गटातून–येल्ले चैतराम काशिराम, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था गटातून–कुंबरे गणराज श्रीराम, रहांगडाले खोमेश्वर नत्थुलाल, इतर मागासवर्ग गटातून–भगत ससेंद्र खेमचंद हे उमेदवार रिंगणात आहेत. या निवडणुकीसाठी दोन्ही पॅनलच्यावतीने प्रचाराला सुरुवात झाली आहे. विशेष म्हणजे सहकारी संस्था गटात माजी आमदार रिंगणात आहेत.

# आरोग्यवर्धिनी केंद्र उद्घाटनाच्या प्रतीक्षेत

**सालेकसा:** तालुक्यातील गोर्रे येथे तालुक्यातील पाचवे आरोग्यवर्धिनी केंद्र (प्राथमिक आरोग्य केंद्र) मागील सात वर्षापुर्वी मंजूर झाले आहे. परंतु ते अद्यापही सुरु झाले नाही. चार वर्षापुर्वी आरोग्यवर्धिनी केंद्राची इमारत तयार झाली. तरी या इमारतीचे लोकार्पण झाले नाही. परिणामी गोर्रे परिसरातील पाच ग्रामपंचायतींच्या १८ गावातील जवळपास १३ हजार नागरिकांना उपचारासाठी पायपीट करावी लागत आहे.

गोर्रे परिसरातील जनतेच्या प्रदीर्घ मागणीवरुन येथे आरोग्य विभागाने आरोग्यवर्धिनी केंद्र मंजूर केले. या प्राथमिक आरोग्य केंद्रात पाच ग्रामपंचायतींच्या १८ गावांतील १३ हजार लोकांना आरोग्य सेवा मिळणार होती. २८ एप्रिल २०१७ ला आरोग्यवर्धिनी केंद्राची मंजूर मिळाली. त्यानंतर आरोग्य विभागाकडून त्यासाठी आवश्यका पदेसुद्धा मंजूर करण्यात आली. मात्र प्राथमिक आरोग्य केंद्र कुठे सुरु करायचे हा एक प्रश्न होता. त्यामुळे १६ जून २०१७ ला आरोग्यवर्धिनी केंद्राची इमारत मंजूर करण्यात आली. इमारतीचे काम सुरु झाले. ३० जुलै २०१९ रोजी आरोग्यवर्धिनी केंद्राची इमारत बनवून तयार झाली. आता फक्त या ठिकाणी आरोग्यवर्धिनी केंद्र सुरु करण्याची गरज होती. त्यासाठी डॉक्टर, नर्स आणि इतर आवश्यक पदेसुद्धा मंजूर करण्यात आली. परंतु नवीन इमारतीचे




लोकार्पण झाले नव्हते. दरम्यान, राज्यात विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागल्यामुळे इमारतीचे लोकार्पण थंड बस्त्यात गेले आणि प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू होऊ शकले नाही. निवडणुकीनंतर नवीन सरकार स्थापन झाले. पालकमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन करायचे होते. परंतु नियमित पालकमंत्री लाभले नाही व उद्घाटनाचा मुहूर्त मिळाला नाही. महाविकास आघाडीचे सरकार कोसळल्यानंतर २०२२ जून महिन्यात राज्यात शिंदे–फडणवीस सरकार स्थापित झाले. परंतु या सरकारला पालकमंत्री नियुक्त करण्यातच बराच कालावधी निघून गेला. परिणामी उद्घाटनाचा मुहूर्त काही निघाला नाही. बऱ्याच कालावधीनंतर राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांची जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी निवड करण्यात आली. परंतु त्यांनाही जिल्ह्याकडे लक्ष देण्यासाठी वेळ नाही. परिणामी, या आरोग्यवर्धिनी केंद्राचे लोकार्पण लांबले आहे.

### उपचारासाठी करावी लागते धावाधाव

लोकार्पणाचा मुहूर्त काढण्याच्या नादात एकीकडे परिसरातील १३ हजार नागरिकांना आरोग्य सेवेपासून वंचित राहावे लागत आहे. तर दुसरीकडे मागील चार वर्षात आरोग्य विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष दिले नाही. आवश्यक आरोग्य कर्मचाऱ्यांची सोय असूनसुद्धा तात्पुरत्या स्वरूपात प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु करायला पाहिजे होते. परंतु तसे करण्यात आले नाही. परिणामी, या परिसरातील गावकऱ्यांची उपचारासाठी दूरवरची पायपीट कायम आहे.

# दोन अट्टल चोरटे पोलिसांच्या जाळ्यात

**गोंदिया:** घरफोडी करुन चोरी केलेले दागिणे सराफा बाजारात विक्री करण्याकरिता आलेल्या दोन चोरट्यांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचून ताब्यात घेतले. ही कारवाई शनिवार (दि.८) रोजी रात्री ८ वाजताच्या सुमारास गोंदियाच्या सराफा बाजारात करण्यात आली. श्रीकांत उर्फ नेहल भगवानदास भिवगडे (वय १९ रा. सुंदरनगर) असे ताब्यात घेतलेल्या चोरांची नावे असून हक विधिसंघर्ष बालक आहे.

पोलीस अधीक्षक निधील पिंगळे यांनी जिल्ह्यातील चोरी, घरफोडी, दुचाकी चोरीच्या गुन्ह्यांचे वाढते प्रमाण लक्षात घेता गुन्हेगारांचा शोध घेऊन गुन्हे उघडकीस आणण्याबाबत स्थानिक गुन्हे शाखेला निर्देश दिले होते. या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिलेश लबडे यांच्या मार्गदर्शनात पोलीस पथक गुन्हेगारांचा शोध घेत असताना सोन्या–चांदीचे दागिने विक्री करण्यासाठी दोन इसम सराफा मार्केटमध्ये फिरत असल्याची गुप्त माहिती शनिवारी रात्री ८



वाजताच्या सुमारास मिळाली. दरम्यान, पोलीस पथकाने सापळा रचून सराफा मार्केट येथे दागिणे विक्रीकरिता फिरणाऱ्या आरोपी श्रीकांत उर्फ नेहाल भगवानदास भिवगडे (वय १९ रा. सुंदरनगर. गोंदिया व शहरातील भीमनगर येथील एका १६ वर्षीय विधी संघर्ष बालकाला ताब्यात घेतले. यावेळी दोघांची पंच व विधी संघर्ष बालकाच्या पालकांच्या समक्ष अंगझडती घेतली असता आरोपी श्रीकांत याच्या खिशातून मंगळसुत्र पदकास किंमयी अंदाजे २ हजार रुपये, एक जोड झुमके किमती २ हजार रूपये व रोख ७ हजार ७०० रूपये असा एकूण ११ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल आढळला. दोघांच्या अंगझडतीत मिळून आलेल्या मुद्देमालाबाबत सखोल विचारपूस केली असता दोघांनी मिळून ४ एप्रिल रोजी रात्रीच्या सुमारास तिरोडा शहरातील राधाकृष्ण वार्ड जुनी वस्ती येथील एका बंद घराचे कुलूप तोडून ६ हजार रुपये व ५ एप्रिल रोजी तिरोडा येथीलच शहिद मिश्रा वॉर्डातील बंद घराचे कुलूप तोडून पदकासह मंगळसुत्र, एक जोड झुमके आणि रोख १३ हजार रुपये व गल्ल्यातील २ हजार असा मुद्देमाल चोरी केल्याचे कबूल केले. दरम्यान दोघेही गुन्ह्यातील मुद्देमाल जप्त करण्यात आला असू विधीसंघर्ष बालकाला वडीलांच्या ताब्यात देण्यात आले. आरोपी श्रीकांत उर्फ नेहाल यास पुढील कायदेशीर कारवाईकरिता तिरोडा पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. ही कारवाई पोलीस अधीक्षक निखील पिंगळे, अप्पर पोलीस अधीक्षक अशोक बनकर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश लबडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक महेश विघ्ने यांनी केली.

# कवलेवाडा येथे जनआरोग्य समितीच्या सभेत विविध विषयांवर चर्चा



**गोरेगांव:–** प्राथमिक आरोग्य केंद्र कवलेवाडा येथे आयोजित जन आरोग्य समितीच्या सभेत विविध विषयावर चर्चा करुन ठराव पारित करण्यात आले.

रुग्ण आणि प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी यांच्यात समन्वय साधून आरोग्याच्या सुविधा जन सामान्यांपर्यत पोहोचविण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रात जन आरोग्य समितीचे गठण करण्यात आले आहे. या अनुषंगाने आज ८ एप्रिल रोजी समितीची सभा समिती अध्यक्ष जिल्हा परिषद सदस्य जितेंद्र कटरे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. यावेळी समिती सदस्य जिल्हा परिषद सदस्य शैलेश नंदेश्वर, पंचायत समिती सदस्य चित्रकला ताई चौधरी, पंचायत समिती सदस्य सुप्रिया ताई गणवीर, जन आरोग्य समिती सदस्य भागचंद्र रहांगडाले, चीचगाव सरपंच भुमेश्वरी रहांगडाले, कवलेवाडा सरपंच ठाकूर ताई, नामदेव नाईक, माजी सरपंच योगेश पारधी, तुमखेडा सरपंच रंजू येळे, डव्वा सरपंच किरण पारधी, समिती सदस्य छोटू भाऊ पारधी, मलिकराम मेळे, रमेश रहांगडाले, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. विनोद चव्हाण, वैद्यकीय अधिकारी डॉ. शुक्ला, डॉ. सिंह आदी उपस्थित होते.

सुरुवातीला सर्व समिती सदस्य यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले. यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्रात पाणी टंचाई तसेच विद्युत पुरवठा बरोबर होत नसल्याची समस्या कर्मचारी यांनी निदर्शनास आणून दिली. समिती अध्यक्ष जितेंद्र कटरे यांनी या समस्या तत्काळ सोडविण्यासाठी प्रयत्नशील आहोत असे सांगितले. जिल्हा परिषद सदस्य शैलेश नंदेश्वर यांनीही वाहनचालक यांचे थकीत मानधन व कंत्राटी आरोग्य सेविका यांना ८ महिन्यांचे दिलेले नियुक्ती आदेश याबाबत सभागृहात संबंधितांना जाब विचारनार असल्याचे सांगितले. यावेळी पंचायत समिती सदस्य चित्रकला चौधरी, समिती सदस्य भागचंद्र रहांगडाले यांनी समितीच्या माध्यमातून जन सामान्यांना जास्तीत जास्त लाभ मिळण्यासाठी नियोजन करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. कार्यक्रमाचे संचालन आरोग्य सेविका माधुरी टेंभुर्णीकर यांनी केले.

# वाहतूक विभागाच्यावतीने वाहन चालकांचे समुपदेशन

**गोंदिया ::** जिल्हा वाहतूक पोलिस शाखेच्या वतीने ७ एप्रिल रोजी शहरातील विविध चौकात नियमां चे उल्लंघटन करणाऱ्या ६० वाहन चालकांवर कारवाई केली. मात्र, वाहतूक नियमांचे प्रथमच उल्लंघन केल्याने वाहन चालकांचे समुपदेशन करण्यात आले.

रस्त्यावरील अपघाताला वाहनचालकांकडून वाहतूक नियमांचे उल्लंघन हे प्रमुख कारण आहे. हे वाहनचालकांनी नियमांचे पालन करुन अपघात टाळावे, या संदर्भात जनजागृती करण्यासोबतच वाहतूक पोलिस विभागातर्फे वेळोवेळी वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई केली जाते. यातंर्गत ७ एप्रिल रोजी शहरातील जयस्तंभ चौक, नेहरू चौक, आंबेडकर चौक, मनोहर चौक आदी ठिकाणी धोकादायकरित्या वाहन चालविणाऱ्या अल्पवयीन वाहन चालविणारे, ट्रिप्पल सिट वाहन चालविणारे, वाहन चालवितांना मोबाईलवर संभाषण करणारे आणि सिग्नल तोडणारे ६० वाहन चालकां विरुध्द कारवाई करून त्यांची वाहने जिल्हा वाहतुक शाखेत जमा करण्यात आले. मात्र ही कारवाई करताना जिल्हा वाहतुक पोलिसांचे उदिष्ट हे सुधारणात्मक असून दंडात्मक नसल्याने तसेच वाहन चालकांनी प्रथमच वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याने पोलीस निरीक्षक जयेश भांडारकर यांनी त्यांच्या कक्षामध्ये समुपदेशन केले.

# नागरिकांच्या तक्रारी अन् जिल्हा परिषद सभापती टेंभरे पोहोचले मोक्यावर!

**गोंदिया:–** मतदार संघातील फुलचुर आंबाटोली येथील नागरिकांनी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधत आपल्या भागातील असलेल्या समस्या अवगत करण्यासाठी त्यांची भेट घेण्यासाठी येत असल्याचे सांगितले. मात्र त्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी खुद्द जि. प. बांधकाम सभापती संजय टेंभरे यांनी मीच येतो असे सांगत मोक्यावर येत कॉलनी वासियांची भेट घेत समस्या जाणून घेतल्या. तसेच त्वरित समस्या निराकरण करण्याचे आश्वासन दिले.

जिल्हा परिषद येथे फुलचुर जिल्हा परिषद क्षेत्राचे प्रतिनिधित्व बांधकाम सभापती संजय टेंभरे करीत आहेत. या क्षेत्रातील फुलचुर व फुलचुर टोला या दोन मोठ्या ग्रामपंचायती शहराला लागून असल्याने निमशहरी भागात मोडतात. नोकरदार वर्ग व व्यापारी वर्ग या भागात मोठ्या संख्येने वास्तव्यास आहेत. असे असूनही अजूनही या भागात रस्ते, नाली व सांडपाण्याची समस्या आ वासून उभी आहे. फुलचुर आंबाटोली येथील सेव्हन हिल्स कॉलनी येथे मागील आठ ते दहा वर्षांपासून नागरिकांचे वास्तव्य आहे. मात्र अजूनही या ठिकाणी सिमेंट कॉंक्रिट रस्ता, नाली व सांडपाण्याची कोणतीच व्यवस्था ग्रामपंचायतीच्या माध्यमातून करण्यात आलेली नाही. वारंवार याबाबत पाठपुरावा केला तरी या भागातील नागरिकांना कोणतीच सुविधा मिळाली नाही. त्यामुळे येथील नागरिकांनी जिल्हा परिषद बांधकाम सभापती संजय टेंभरे यांची भेट घेऊन निवेदन देण्याचे ठरविले. यासाठी भ्रमणध्वनीवरून त्यांच्याशी चर्चा करुन येत असल्याचे



सांगितले. मात्र संजय टेंभरे यांनी तुम्ही त्रास करुन घेऊ नका, मीच मोक्यावर येतो व शक्य होईल ती मदत करण्याचे आश्वासन देत अवघ्या काही तासातच आंबाटोली येथील सेव्हन हिल्स कॉलनी येथे भेट देऊन नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी सेवानिवृत्त माजी सैनिक बाबुलाल मेश्राम, पोलिस कर्मचारी आशिष पडोळे, खोमेश पटले, भागचंद्र रहांगडाले, सुनील रहांगडाले, रोहित रामटेके, माजी सैनिक शेखर खोब्रागडे, माजी सैनिक उईके आदी उपस्थित होते. यावेळी दोन महिन्याच्या आत सदर रस्ता बांधकाम करुन देणार असल्याचे आश्वासन त्यांनी दिल्याने नागरिकांनी त्यांचे आभार व्यक्त केले.

# महिला लोकशाही दिन १७ एप्रिलला

**गोंदिया:** महिला व बाल विकास विभागाच्या वतीने जिल्हा स्तरावर दर महिन्याचा तिसरा सोमवार महिला लोकशाही दिन म्हणून साजरा करण्यात येतो. महिलांच्या कोणत्याही विभागाशी संबंधीत समस्या, वैयक्तीक समस्या, गाऱ्हाणी, अडीअडचणी याबाबत महिला लोकशाही दिनात त्यांचे निवेदन स्विकारण्यात येतात अशी माहिती जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी तुषार पौणिकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे. सोमवार १७ एप्रिल २०२३ रोजी जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे, असेही त्यांनी सांगितले आहे. सर्व महिला कर्मचारी व महिला मंडळ, बचत गट इतर महिलांसाठी काम करणाऱ्या संस्था येथील महिला थेट सभेमध्ये येऊन वैयक्तीक तक्रार नोंदवू शकतात. तालुका स्तरावरील अर्ज तालुका स्तरावर चौथ्या सोमवारी सादर करावेत. अर्जाचा नमुना बाल विकास अधिकारी यांचेकडे नि:शुल्क प्राप्त होईल.

# अदाणी फाऊंडेशन तिरोडा व्दारा मोफत मोबाईल हेल्थ केयर युनिटचे शुभारंभ



**तिरोडा:** अदाणी विद्युत प्रकल्प लगतच्या २५ गावातील गावकरींना मोफत व गुणवत्तापूर्ण आरोग्य सुविधा उपलब्ध व्हावी या उद्देशाने अदाणी फाऊंडेशन तिरोडा द्वारा मोफत मोबाईल हेल्थ केयर युनिटचे शुभारंभ ग्रामपंचायत चिरेखनी येथे करण्यात आले.

मोफत मोबाईल हेल्थ केयर युनिट विद्युत प्रकल्पाच्या नजिकच्या २५ गावांमध्ये प्रत्येक आठवड्याला मोफत आरोग्य सेवा ग्रामस्थांकरिता असून जवळपास ४०००० ग्रामस्थांना या सुविधेचा लाभ होईल.

या शुभारंभप्रसंगी मोबाईल हेल्थ केअर युनिटचे उद्घाटन ग्रामपंचायत चिरेखनीचे सरपंच संजय कोटांगले, ग्राम पंचायत सदस्य संजय बिसेन, सुनिता पारधी व उपस्थित ग्रामस्थांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटनाकरिता प्रमुख पाहुणे अदाणी फाऊंडेशन तिरोडाचे प्रमुख विमुल पटेल, अदानी विद्युत प्रकल्पाचे एच.आर.हेड हरीप्रसाद अडथडे, अदाणी विद्युत प्रकल्पाचे सिक्युरिटी हेड राजेंद्र मुरई, कार्पोरेट विभागाचे पियुश दिघावकर, अदाणी फाऊंडेशन तिरोडाचे वरिष्ठ प्रकल्प अधिकारी (आरोग्य) स्वप्नील वाहाने व अन्य ग्रामस्थ उपस्थित होते.

# भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेंतर्गत १६ बहुवार्षिक पिकांचा समावेश

**गोंदिया :** पारंपरिक धान शेतीसोबतच जिल्ह्यातील शेतकरी आपल्या शेतात वेगवेगळे प्रयोग करीत आहेत. केवळ धान पिकांवर अवलंबून न राहता फळबाग सारखी नगदी पिके घेण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढत आहे. अशा प्रयोगशील शेतकऱ्यांसाठी कृषी विभागाची भाऊसाहेब फुंडकर फळबाग योजना उपयुक्त ठरते आहे. कमी कालावधीत येणाऱ्या या पिकाला बाजारपेठेत सुद्धा मोठ्या प्रमाणात मागणी असते. आपल्या शेतात सतत नवनवीन प्रयोग करणाऱ्या शेतकऱ्यांनी फळबाग योजनेचा लाभ घेऊन आपली आर्थिक उन्नती साधावी यासाठीच ही योजना आहे.

भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना राबविण्यास शासनाकडून मंजुरी मिळालेली आहे. सदर योजना महाडीबीटी पोर्टलवर राबविण्यात येत आहे. त्यानुषंगाने सदर योजनेअंतर्गत लाभ क्षेत्र मर्यादा किमान ०.२० हेक्टर ते ६.०० हेक्टर मर्यादा अनुज्ञेय राहील. भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

### समाविष्ट पिके

भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजने अंतर्गत १६ बहुवार्षिक पिकांचा समावेश करण्यात आलेला आहे. (आंबा, काजु, पेरु, डाळींब, कागदी लिंबु, मोसंबी, संत्रा, नारड, सिताफळ, आवळा, चिंच,




जांभुळ, कोकम, फनस, अंजिर व चिकु इत्यादी कलमे/रोपे) शेतकऱ्यांना आवश्यकतेनुसार सर्व फळपिकांच्या कलमे/रोपांची लागवड करण्यास योजना अंमलबजावणी असेपर्यंत मान्यता आहे.

### लाभार्थी पात्रता

खालील अटीची पुर्तता करणारे शेतकरी योजनेचा लाभ घेण्यास पात्र असतील.

१. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत जे शेतकरी फळबाग लागवडीकरिता पात्र ठरु शकत नाहीत असे शेतकरी.

२. या योजने अंतर्गत वैयक्तिक शेतकऱ्यांनाच लाभ घेता येईल. संस्थात्मक लाभार्थ्यांना लाभ घेता येणार नाही.

३. शेतकऱ्यांच्या स्वतःच्या नावे ७/१२ असणे आवश्यक आहे. जर ७/१२ उताऱ्यावर लाभार्थी संयुक्त खातेदार असेल तर सर्व खातेदारांचे फळबाग लागवडीसाठी संमतीपत्र आवश्यक राहील.

४. जमिन कुळ कायदयाखाली येत असल्यास ७/१२ च्या उताऱ्यावर जर कुळाचे नाव असेल तर योजना राबविण्यासाठी कुळाचे संमतीपत्र आवश्यक राहील. महाडीबीटी प्रणाली सुरु झाल्यापासुन सदर योजने अंतर्गत लाभ मिळण्यासाठी प्राप्त होणाऱ्या अर्जामधुन सर्वसाधारण, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, महिला व दिव्यांग व्यक्ती यांची निवड करण्यात येईल. तरी इच्छुक शेतकऱ्यांनी https://mahadbtmahait.gov.in या ऑनलाईन पोर्टलवर जाऊन अर्ज करावेत. ऑनलाईन लॉटरीमध्ये निवड झाल्यानंतरच प्राप्त लक्षांकाच्या मर्यादेत तालुका कृषि अधिकारी यांचे मार्फत पुर्वसंमती देण्यात येईल. तसेच अधिक माहितीसाठी संबंधीत तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.

# नागपुरच्या इंस्पायर संस्थेतर्फे विजय ठोकणे सन्मानित

**गोंदिया::** दिव्यांग मुलांना येणाऱ्या अडीअडचणी सोडविण्यासाठी त्यांच्या मोफत शस्त्रक्रिया केल्यानंतर निरंतर थेरपी सेवा व पुनर्वसन करण्यासाठी नागपुर येथिल बाल अस्थिरोग तज्ज्ञ डॉ विराज शिंगाडे यांनी हिंगणा नागपुर यांच्या इंस्पायर या सर्व समावेशक केंद्राचे उद्घाटन देशाचे माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते दिनांक ९ एप्रिल रोजी सकाळी पार पडले यावेळी गेल्या विस वर्षापासुन गोंदिया जिल्ह्यातील दिव्यांग मुलांना सेवा देणारे समग्र शिक्षा विभागाने जिल्हा समन्वयक यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी राज्यसभेचे खासदार डॉ. विकास महात्मे, कर्नाटकचे खासदार डी.



विरय्या, इंस्पायर च्या उपाध्यक्ष डॉ रश्मी शिंगाडे व इतर मान्यवर उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे नियोजित प्रमुख पाहुणे राज्यांचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व्यस्ततेमुळे हजर राहू शकले नाही.

माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी यावेळी दिव्यांग बांधवांना समानतेची वागणूक देण्याची जबाबदारी सर्व समाजाची असल्याचे मत व्यक्त करुन डॉ विराज शिंगाडे यांनी स्थापन केलेल्या केंद्राचे तोंडभरुन कौतुक केले. हा सन्मान झाल्याबद्दल जिल्हा समन्वयक विजय ठोकणे यांनी गोंदिया जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील व शिक्षणाधिकारी प्राथमिक डॉ महेंद्र गजभिये यांचे मार्गदर्शन व जिल्ह्यात कार्यरत समावेशीत शिक्षण तज्ञ तथा रिसोर्स टीचर यांच्या मेहनतीचे फळ असल्याचे मत व्यक्त केले.